# दुष्काळ...
## नैसर्गिक आणि वैचारिक


ग्रंथाली वाचक चळवळीचे
# रुची
मार्च २०१३ • मूल्य १० रु.



## ग्रंथप्रदर्शन क्षणचित्रे

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने



















ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**मार्च २०१३, वर्ष ३१ वे**
**अंक तिसरा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
granthali02@gmail.com
www.granthali.com

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दीची सांगता या महिन्यात होत आहे. विवेकाची ओल धरून समाजकारण केलेल्या या नेत्याचे वारस 'आपुल्या मते उगीच चिखल' कसा उडवत आहेत हे आपण पाहत आहोत. ज्या मराठवाड्यानं संतांची मांदियाळी दिली आणि विवेकाची ओल धरायला सांगितली तिथे दुष्काळ पाचवीला पुजला आहे आणि इतरत्र जे पाणी मुरलं आहे त्याचा वापर चिखलफेकीसाठी होतो आहे हे 'आधुनिक' महाराष्ट्राचं दुर्दैवच. 'जशास तसे' अशी भाषा करणाऱ्या नेत्यांना विचारस्वातंत्र्य काय असतं हे सांगण्याची वेळ शरद पवारांवर आली आहे. अर्थात, असे सुबरीचे सल्ले प्रत्येक गदारोळानंतर ते देत आले आहेत हेही वास्तव आहे. या वर्षीचा दुष्काळ भयानक स्वरूपाचा असेल हे सांगण्याचं सहजपण राज्यकर्त्यांत आलं आहे हेच गेल्या साठ वर्षांच्या प्रगतीचं फलित दिसतं. सतत एखादा भाग दुष्काळ झेलत राहतो हे बोचू नये इतकं सरकार बोथट झालं आहे. १२ मार्च रोजी यशंतवराव चव्हाण जन्मशताब्दीची सांगता करायला हेच निर्विकार आणि स्थितप्रज्ञ उपस्थित असतील. जय महाराष्ट्र!

या अंकात दुष्काळाचे चटके जाणवणारा लेख आहे. प्रभाकर वाईरकर 'एका व्यंगचित्रकाराची ओळख' करून देत आहेत. 'भिरभिर' हे नवीन ललित सदर या अंकापासून रविराज गंधे लिहीत आहेत. 'थिंक महाराष्ट्र'द्वारा डोळे उघडणारा लेख आहे. अपर्णा पाटील ऑस्करविजेत्या अभिनेत्याचं झपाटलेपण व सहज जगणं सांगत आहेत.

**– कार्यकारी संपादक**

# 'टँकरमय'तेच्या अंतरंगात

## राज कुलकर्णी

स्थळ: लाडसावंगी
वेळ : सकाळचे अकरा
दिनांक: दोन महिन्यापूर्वीचा
(३१ डिसेंबर २०१२ )

गावात भली मोठी रांग लागलेली. सगळा चौक घागरींनी व्यापलेला. टँकर यायला आज उशीर झाला. लांबून कोठूनतरी टँकरचा आवाज आला. सगळेजण धावत सुटले, भान हरपल्यासारखे. कोणी टँकरवर चढले तर कोणी प्लास्टिकची नळी टाकली. घागरभर पाण्याच्या संघर्षात राजू भालेरावही उतरला. १३ वर्षाचे शाळकरी पोर. घरात आजीला पाणी कसे भरता येईल, म्हणून तो टँकरवर चढला. गर्दी एवढी, की कोण कोणाकडे पाहतो? पाणी संपले, तेव्हा कोणाच्यातरी लक्षात आले, टँकरच्या चाकाला रक्त लागले आहे. राजू केव्हातरी पडला... टँकर मागे-पुढे घेताना केव्हा-कसा चिरडला गेला, काय माहीत! त्याच्या डोक्यावरून गाडी गेली होती. गावातील शाळकरी वयाचे पोर गेले. सारा गाव हळहळला. वर्तमानपत्रात मोठी बातमी आली. दुष्काळाचा हा संदर्भ आज कशासाठी? - ज्या दिवशी मनसे-राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी 'राडादिन' पाळला ना, त्या दिवशी राजूचे वडील सरकारी कार्यालयात दिसले. कोणीतरी त्यांना सांगितले होते, अर्ज केला तर मदत मिळेल. मजुरी करून पोट भरणाऱ्या राजूच्या वडिलांनी अर्ज लिहून घेतला. त्याला पिवळ्या रेशनकार्डाचा क्रमांक असणारा कागद जोडला. पुरावा म्हणून 'आधार'ची नोंद जोडली. ती सर्व कागदपत्रे अधिकारी आणि मंत्र्यांना दिली. ते फिरत होते, कोणाचा 'आधार' मिळतो का पाहात. त्यांना मदत मिळेल? - कदाचित नाहीच. नंतर बातमी कोठे आली नाही.

या घटनेने प्रशासनाने मात्र एक धडा घेतला, तो असा- प्रत्येक गावात टँकरचे पाणी सार्वजनिक विहिरीतच टाकायचे. याच काळात यंत्रणेला पाणी साठवण्यासाठी टाक्याच नसल्याचा साक्षात्कार झाला. टाक्या घेता येऊ शकतात काय याची चाचपणी सुरू झाली. पुढे सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांनी साखर कारखान्यांनी गावागावात प्लास्टिकची टाकी देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे कळवले. प्रशासनानेही पत्र काढून सर्वांना आवाहन केले. ज्यांनी दुष्काळात ऊसाचे मोठे गाळप केले होते, त्यांनी या कामी मोठा पुढाकार घेतला. विशेष म्हणजे त्याची बातमी होऊ नये याची दक्षताही घेतली. आजही लाडसावंगी गावाला टँकरनेच पाणीपुरवठा होतो. काही दिवसांपूर्वी जेव्हा मराठवाड्यातील तापमान १०-१२ अंश सेल्सिअस होते, तेव्हाही टँकर होता आणि आजही आहे. आता ऊन वाढू लागले आहे. जेथून या गावाला पाणी आणले जायचे तो पाण्याचा स्रोत आटला आहे. जरासे लांबून पाणी आणताना टँकरच्या ड्रायव्हरला भारनियमनाच्या वेळा पाळाव्या लागतात. ज्या विहिरीतून पाणी आणले जायचे त्या विहिरीचे झरे आटू लागले आहेत. झऱ्यातून पाणी येण्याचा वेग एवढा मंद झाला आहे की, दिवसभरात दहा हजार लिटरचा एखादाच टँकर भरला जातो. आणखी पाच महिने लाडसावंगीला टँकरनेच पाणीपुरवठा करायचा आहे. तो कसा होणार? मराठवाड्यात अशी हजारो गावे आहेत. जेथे दुष्काळाची दाहकता वाढतेच आहे. हा मजकूर लिहून पूर्ण होईपर्यंत ९९९ टँकरची नोंद सरकारदप्तरी होती. कोणत्याही क्षणी ती वाढेल. पण पाणी आणायचे कोठून आणि कसे, हा प्रन म्हणजे समस्यांचे भेंडोळे आहे. कोरड्या धरणांमध्ये वाढलेल्या वेड्या बाभळीलादेखील आता हिरवी पाने शिल्लक राहिली नाहीत. प्रत्येक गावाच्या पिण्याच्या पाण्याची करुण कहाणी होईल, असे हे चित्र. मराठवाड्याच्या दिशेने एक दगड भिरकावला तर तो दुष्काळी गावातच पडेल एवढी त्याची व्याप्ती.

मागील पाच-सहा महिन्यांपासून दुष्काळ या शब्दाभोवतालच्या घटनांचा आलेख मोठा चित्रविचित्र. अनेक गावे पेरणीविनाच राहिलेली. काही गावांमध्ये गेल्या वर्षी मार्चमध्ये लागलेले टँकर हटलेच नाहीत. दुष्काळ पडला अशी ऑगस्टमध्येच प्रत्येकाची खात्री झाली होती. तेव्हा प्रशासनातील अधिकारी पाऊसमान कसे बदलते आहे, याविषयी 'पॉवर पॉईंट'वर सादरीकरण करायचे. पुढे स्थिती हाताबाहेर जाऊ लागली. तसे अधिकाऱ्यांना कळले, प्रश्न खरा असेल तो मोठ्या शहराच्या पिण्याच्या पाण्याचा. त्यात औरंगाबादचे नाव येणे अपरिहार्य होते. कारण मराठवाड्यातील सर्वाधिक साठवणूक क्षमता असणारे ९८ टीएमसीचे एकमेव धरण असणाऱ्या

जायकवाडी जलाशयात अर्धा टक्काही पाणी नव्हते. पावसाळा संपलाच होता तेव्हा. नगर आणि नाशिक जिल्ह्यांतील धरणे भरली होती. नगर जिल्ह्यात तर गरज नसताना पावसाळ्यातही शेतीसाठी पाण्याची आवर्तने सोडली होती. औरंगाबाद शहर आणि भोवतालच्या ३०० गावांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न जाणवू नये म्हणून वरच्या धरणातून पाणी सोडण्याच्या मागणीने जोर धरला. समन्यायी पाण्यासाठी आंदोलने झाली. त्या काळात कृषीमंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांनी कुरघोडी करून घेतली. राष्ट्रवादीने तर काँग्रेसला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. यामध्ये औरंगाबादचे पालकमंत्री बाळासाहेब थोरात मात्र बदनाम झाले. पुढे दोन टप्प्यांत १२ टीएमसी पाणी सोडण्यात आले. ते योग्यच होते. पण यामुळे प्रशासन आणि सरकारमध्ये मानसिकता वाढत गेली. ती, पिण्याचे पाणी दिले की उपाययोजना पूर्ण झाल्या.

खरीप हंगामातील पैसेवारीच्या मदतीसाठी केंद्र सरकारने 'मोठे' पॅकेज द्यावे, अशी मागणी उशिरानेच झाली. ती पुढे बरेच दिवस लटकली. मराठवाड्याच्या दौऱ्यावर केंद्र सरकारचे सिक्का नावाचे एक अधिकारी आले. त्यांनी उस्मानाबाद व जालना या जिल्ह्यांतील दुष्काळाची काही तासांतच पाहणी केली. शेतकऱ्यांचा कैवारी असणाऱ्या एकाही मंत्र्याने खरीप हंगामात दौरा केला नाही. तेव्हा अधिकाऱ्याच्या अहवालावर ७७८ कोटी रुपयांची मदत राज्य सरकारला झाली. या मदतीमुळे सरकारने टँकर लावले, चारा–छावण्या उघडल्या. या छावण्या अतिशय 'आदर्श'च असल्या पाहिजेत; नव्हे त्या आहेतच, असा दावा अधिकारी छातीठोकपणे करतील. याचे कारण दुधाच्या आकडेवारीत दडले आहे. राज्यातल्या ज्या जिल्ह्यांमध्ये दुष्काळ आहे, चाऱ्याची प्रचंड कमतरता आहे, असे वारंवार सांगितले जाते, त्या जिल्ह्यात दुधाचे प्रमाण मात्र अजिबात घटले नाही. हा चमत्कार कसा? असले विरोधाभासी प्रश्न दुष्काळात उभे करायचे नसतात. तसे केले की, दुष्काळाची कणव नसल्याचा अर्थ सहजपणे काढता येतो.

जालना जिल्ह्यातील ४४ गावे अशी आहेत की जेथे खरीप हंगामातच पेरणी झाली नाही. उत्पन्न मिळण्याची शक्यताच नसणाऱ्या या गावांतील शेतकऱ्यांना, नागरिकांना सरकारकडून दिलेली एकमेव मदत म्हणजे टँकरचे पाणी. पाऊस येईल या आशेवर काहींनी पेरणी केली, सारे रान सुकून गेले. ना पंचनामे झाले ना मदत मिळाली. एरवी अतिवृष्टी झाली की पंचनामे करणाऱ्या यंत्रणांना दुष्काळात आदेशच आले नाहीत! दुष्काळाचे अहवाल नक्की कसे द्यायचे हाच संभ्रम होता की काय, असे वातावरण होते. अहवाल तयार आहेत पण ते कोणी मागतच नाही, असे कृषी विभागाचे अधिकारी सांगत. एका बाजूला हे शेतीचे चित्र आणि मराठवाड्यात सर्वत्र तीव्र पाणीटंचाई.

तशी येथे पाणीटंचाई नवी नाही. ज्या जालना शहरात तीव्र पाणीटंचाई आहे, तेथे आजही २० ते २२ बाटलीबंद पाण्याच्या कंपन्या आहेत. त्याला एक लिटर पाणी शुद्धिकरणासाठी साधारण तीन लिटर पाणी लागते, हे येथे लक्षात घ्यायला हवे. हे चित्र असे कसे? केवळ जालनाच नाही तर औसा, निलंगा, उदगीर, अहमदपूर, उमरगा, उस्मानाबाद या शहरांत पाण्याची वणवण नेहमीचीच. उदगीर शहराला मध्यंतरी तब्बल २१ दिवसांनंतर पाणी मिळाले. कारण या शहराची जलवाहिनी आणि टाकी म्हणजे जणू फुटके मडकेच. कितीही पाणी असते तरी ते पोचू शकले नसते. अशीच अवस्था उस्मानाबाद शहराची. गेल्या आठ वर्षांपासून



सर्वकाळ आठवड्यातून दोनदाच पाणीपुरवठा होत असे. कारण वाढत्या लोकसंख्येची योजनाच तयार नव्हती. योजना तयार झाली तेव्हा त्यातही अनेकांनी हात धुऊन घेण्याचा प्रयत्न केला. तक्रारी झाल्या. योजना रखडली. अशा रखडलेल्या योजनांसाठी दुष्काळ ही संधी बनली. बहुतांश शहरातील पाणीपुरवठ्याच्या योजना कायमस्वरूपी कंत्राटदारांच्या हातात दिल्या जाणारा होत्या. तरीदेखील पाणीटंचाईची भीषणता लक्षात घेता सरकारने कोट्यवधीचा निधी मंजूर केला. योजना का रखडवल्या गेल्या, या प्रश्नाचे उत्तर मोठे जटील आहे. मराठवाड्यातील बहुतांश नगरपालिका आणि महापालिकांची आर्थिक स्थिती मेळघाटातील कुपोषित मुलांसारखी आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याच्या योजनांसाठी राज्यसरकार कधीतरी मदत करेल, अशी भाबडी आशा वर्षानुवर्षे नागरिकांनी बाळगली. त्याला बड्या नेत्यांनी खतपाणी घातले. दुसरी एक मानसिकता यात आहे. पाणीपुरवठ्याच्या योजनेत पैसै न खाणाऱ्याला वेडे ठरवले जाते. (अर्थात हे चित्र सर्वत्रच आहे. पाणी क्षेत्रात काम करणाऱ्याला तर पद्धतशीरपणे बाहेर काढले जाते.) ग्रामीण भागात लोकप्रतिनिधींवर अविश्वास ठराव आणले जातात. खरे तर मागील दशकात ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्यासाठी सर्वाधिक पैसा ओतला गेला. जागतिक बँकेच्या सहकार्याने 'जलस्वराज्य', 'भारतनिर्माण' या योजना आल्या. या योजना जेव्हा सुरू झाल्या त्या काळात शहरात पाणीपुरवठ्यावर काम करणारे कर्मचारी, कंत्राटदार कसे 'मुसमुसले', हे ग्रामीण भागातील बेरकी राजकारण्यांनी ओळखले होते. त्यासाठी कवच म्हणून जातीचा आधार घेतला. परिणामी ही यंत्रणा 'अशी'च असते, अशी मानसिकता ग्रामीण भागात तयार झाली. पाणीपुरवठ्याची यंत्रणा हाताळणारे बहुतांश कर्मचारी दहावी–बारावी उत्तीर्ण याच श्रेणीतील आहेत. म्हणजे गावातील अंतर्गत जलवाहिनी माहीत असणारा जाणकार माणूस अभियंता नसतो तर तो 'प्लंबर' असतो! मूलत: या क्षेत्रातील तांत्रिक ज्ञान असणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नावाच्या यंत्रणेला लकवा मारला आहे. पाणीपुरवठ्याच्या योजनेत लोकसहभाग असावा, त्यांनी काही आर्थिक भार उचलावा अशी योजनांची अट असते. एकेका योजनेची किंमत १५० ते २०० कोटी रुपये असेल तर लोकसहभागची रक्कम २० कोटींच्या घरात जाते. ही रक्कम उभारणे जेथे शक्य झाले नाही तेथे योजना रखडल्या. हा भार जेथे कंत्राटदार उचलतो, तेथे योजनांच्या काही खुणा दिसतात. अन्यथा नुसतेच सांगाडे. विशेष म्हणजे पाणीपुरवठ्याच्या तांत्रिकतेवर कोणीच भाष्य करत नाही. 'लावा टँकर' असे आदेश या मानसिकतेतून निर्माण झालेले आहेत.

मराठवाड्यात सध्या टँकरराज्य आहे. टँकरचे बहुतांश ठेकेदार मात्र पश्चिम महाराष्ट्रातील आहेत. दुष्काळी भागात दोन प्रकारची चित्रे दिसतात. एक चित्र रुतलेल्या अर्थकारणाचे तर दुसरे 'दुष्काळ आवडे सर्वांना' या आशयाचे. दुष्काळाच्या भीषणतेवर व्यक्त होणारा राजकीय पक्ष कोणता? विरोधी पक्षात असणाऱ्या शिवसेनेने जालना शहरात मोठी सभा घेतली. खूप गर्दी जमवली. त्यात दुष्काळाविषयीची चिंता होती, पण दिशादर्शक मांडणी नव्हती. कोणते निकष बदलायला हवेत, नक्की काय बदल करण्याची गरज आहे हे त्यांना सांगता आले नाही. कारण ग्रामीण भागाशी आणि वर्तमानातील योजनांची जाणच नेत्यांमध्ये नाही. टीका व्हावीच, पण आपल्या बाजूने काय देणार, हे विरोध करणाऱ्यांकडून सांगितले जात नाही. चारा छावण्यातील जनावरांना मिळणाऱ्या चाऱ्याचे दर सरकारने एके दिवशी अचानक कमी केले. तेव्हा 'का?' असा सवाल विरोधीपक्षातून झाला नाही. मोठ्या जनावराला ३२ रुपये आणि छोट्या जनावरासाठी १६ रुपये असे मिळणारे केंद्राचे अनुदान कमी आहे, असे जेव्हा मुख्यमंत्र्यांनी सांगितले त्यानंतर तशा





मागण्यांची निवेदने करून ती सादर करतानाचे फोटो वर्तमानपत्रात देण्यापलीकडे विरोधी पक्षाने फारसे काम केले नाही. भाजपचे नेते गोपीनाथ मुंडे तर गेल्या वर्षी एप्रिलपासून आंदोलन करण्याची घोषणा करत होते, नंतर ते दुष्काळी भागाची परिक्रमा करणार होते. पण कोठे माशी शिंकली कोण जाणे! त्यांनी देखील फारसे काही केले नाही. केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार जोपर्यंत दौऱ्यावर आले नव्हते तोपर्यंत दुष्काळाची सगळी हाताळणी निवेदनाच्या पातळीवरच होती. तत्पूर्वी शिवसेनेच्या नेत्यांनी काही भागांत दौरे केले, पण काय मागण्या करायच्या आणि सरकारला कसे घेरायचे हे त्यांना कळलेच नाही. काँग्रेस पक्षाचा बडा नेता आता मराठवाड्यात शिल्लक नाही. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांना मतदारसंघाबाहेर पाहायचे नाही. शिक्षणमंत्री राजेंद्र दर्डा यांचे घर काचेचे आहे. त्यावर कोणीतरी कोळसा फेकून मारेल म्हणून ते कोठेच नसतात. काँग्रेसचे दुसरे मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी विभागीय पातळीवरची एकही बैठक घेतली नाही. चाऱ्याचे प्रश्न मांडले नाहीत, की दिलासा देणारे एकही विधान केले नाही. प्रतिमा जपण्यासाठीसुद्धा मराठवाड्यातील नेते काहीच करत नसल्याचे चित्र आहे. या सर्व परिस्थितीत राष्ट्रवादीचे आमदार मात्र पद्धतशीपणे 'दुष्काळ आवडे' श्रेणीतील सर्व उपक्रम हाती घेत आहेत. कोणी काहीच करत नाही त्यामुळे त्यांचे सध्या बरे आहे. तरुण मुलांना पक्ष संघटनेत ओढता यावे, अभिनिवेशाची मोट बांधता यावी, अशी त्यांच्या दुष्काळी कामाची रचना आहे. विद्यापीठात शिकणाऱ्या मुलांना शिक्षणासाठी मदत करणे हा त्याचाच एक भाग. ते जे करत आहेत ते अयोग्य आहे असे नाही, पण त्यातील राजकारण नजरेआड करता येणार नाही. एका बाजूला अर्थकारण आकसत चालले आहे. तर दुसऱ्या बाजूला राजकारणावर प्रचंड खर्च होतो आहे. केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांचा दौरा झाल्यानंतर तर मराठवाड्यात नेत्यांमध्ये दौरे करण्याची जणू चढाओढच सुरू आहे. हे नेते सहा महिन्यांपूर्वी का आले नाहीत? उत्तर राजकारणात दडले आहे.

मराठवाड्यातील जालना, उस्मानाबाद, औरंगाबाद आणि बीड या जिल्ह्यांतील दुष्काळ अधिक तीव्र असला तरी उपाययोजनांवर झालेला खर्च सांगली, सातारा, नगर, कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये आहे. कारणे नाना सांगता येतील, पण राजकीय इच्छाशक्ती आणि निधी पळवून नेण्याच्या वृत्तीमुळे मराठवाड्यातील दुष्काळावर पोतेरे फिरवण्याचे काम सुरू आहे. एका बाजूला तीव्र पाणीटंचाई आणि दुसऱ्या बाजूला मोठ्या प्रमाणात ऊस. पीकरचना बदलावी असे वाटते का, असे कृषीमंत्री शरद पवार यांना विचारले तेव्हा त्यांनी मराठवाड्याच्या उन्नतीसाठी साखर कारखाने महत्त्वाचे असल्याचे सांगितले. खरे तर मराठवाड्यातील बीड, औरंगाबाद आणि जालना जिल्ह्यांत कापसाचे मोठे क्षेत्र. यावर्षी ज्यांनी पेरणी केली त्यांचे मोठे नुकसान झाले. एक एकरांत होणारे कापसाचे उत्पादन पाच एकरातही झाले नाही. असे अनेक शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत होते. आता ते कंटाळले आहेत. किमान पुढच्या हंगामात कापसाच्या बियाणात, खताच्या किमतीत सवलत मिळाली तरी चालेल, असे ते सांगतात. फळबाग लावणारे शेतकरी तर पूर्णत: कोलमडले आहेत. डोक्यावरचे कर्ज फिटेल का, ही चिंता नव्याने वाढली आहे. अशीच स्थिती २००४ ते २००६ मध्ये होती. तेव्हा कर्जमुक्ती, कर्जमाफीची मानसिकता तरी राज्यकर्त्यांमध्ये होती. आता फक्त एकच उपाययोजना, ती म्हणजे टँकर. येत्या काही दिवसांत साडेचार हजार टँकर लागतील. त्याची व्यवस्था करण्यात प्रशासन मग्न आहे. काही ठिकाणी रेल्वेने पाणी आणावे लागेल. त्यासाठी रेल्वे वॅगन कशा मिळतील, हे तपासले जात आहे. ऑईलच्या वाघिणी पाण्यासाठी वापरता याव्यात याची तजवीज केली जात आहे. पाण्याअभावी वीजकेंद्र बंद पडले आहे. पाण्यासाठी कोरड्या धरणात चर घेतले जात आहेत. टंचाईच्या सर्व उपाययोजनांची माहिती डिजिटलाईज्ड आहे. पिण्याच्या पाण्याची सारी भिस्त ३० जूनपर्यंत आहे. म्हणजे मृग निघाल्यानंतर २३ दिवसांत पाण्याचे साठे निर्माण होतील, असे गृहीत धरून केलेले नियोजन आणि टंचाईचे अंतरंग सध्यातरी फक्त 'टँकरमयच' आहे.

**– राज कुलकर्णी**
उस्मानाबाद



रविराज गंधे



# हरवलेलं गाणं

## रविराज गंधे

परवा सर्फिंग करता करता एका चॅनेलवर हिंदी फिल्म इंडस्ट्रीची आजची आघाडीची गायिका ममता शर्मा हिची मुलाखत पाहायला मिळाली. आता कोण ही ममता शर्मा? अन् तिची लोकप्रिय गाणी कुठली? आणि ती आघाडीची गायिका कशी? असे काही बालिश प्रश्न तुमच्या मनात येतील. तर, 'आऽऽरेऽ प्रीतम प्यारे'.., 'अनारकली मैं डिस्को चली'..., 'तेरे होठों को सीने से यार चिपका दे फेव्हिकॉल से'... असे तिनं गायलेले तुफानी आयटम नंबर्स सध्या प्रचंड लोकप्रियता मिळवत आहेत. हीच गाणी अहोरात्र रेडियो-टीव्हीवर वाजत-गाजत असल्यानं ती आघाडीची गायिका ठरली आहे. परिणीती चोप्रा ही प्रियांका चोप्राची बहीण आहे, 'आता माझी सटकली' हा डायलॉग 'सिंघम'मधला आहे आणि ममता शर्मा आघाडीची गायिका आहे हे जर तुम्हाला माहीत नसेल तर तुमची जिंदगी फिजूल आहे.

तर मुलाखतीच्या ह्या कार्यक्रमात ममता दिलखुलासपणे आपल्या गाण्यांविषयी बोलत होती. मुलाखत घेणाऱ्यानं तिला ''तू शास्त्रीय संगीताचं कुठे शिक्षण वगैरे घेतलंस का?'' असं विचारलं. त्यावर तिनं उत्तर दिलं, ''नाही! मी कुणाकडे गाणं वगैरे शिकले नाही. आशा-लता ह्या महान गायिका माझं दैवत आहे. लहानपणापासून त्यांची अनेक गाणी मी ऐकत आलीय. त्यांनी गायिलेली प्रेमगीतं, विरहगीतं, गझल, भजनं अनेक वेळा ऐकून त्यातल्या ताना, आलाप, हरकती, गाण्याचा ढंग मी आत्मसात केला. तशी प्रॅक्टिस केली अन् गायला सुरुवात केली. इंटरनेटवरही गाणं शिकते.'' तिचं हे अफाट उत्तर ऐकून मी बसल्या जागीच सर्द झालो! तुमच्या हातात बुक नसलं तरी चालेल पण तुम्ही फेसबुकवर असणं गरजेचं आहे. शेजारच्या फ्लॅटमधल्या माणसांशी तुम्ही कधी बोलला नाही तरी हरकत नाही पण ट्विट (Twitt) करणं आवश्यक आहे. फेसबुकचा एक धमाल किस्सा नुकताच ऐकायला मिळाला. एका मुलीनं आपल्या मैत्रिणींना 'फेसबुक'वर आपले आजोबा वारल्याचं कळवलं. तिच्या २५-३० मित्रांनी ते 'लाईक' केलं. आता आजोबा गेल्यावर 'लाईक' करण्यासारखं काय आहे? एकूणच आपली संवेदनशीलता बधीर होत चाललीय का? गाणं हे तर गंधर्वसुरांचं लेणं आहे. ते इंटरनेटवर कसं शिकणार? खरं म्हणजे आता चांगलं गाणं अन् त्यासाठी दिलं जाणारं संगीतशिक्षण हे दोन्ही संपलंय. उरलीय ती आता फक्त चांगल्या गाण्यांची नक्कल! गेल्या वर्षी तरुणाईचं गाणं म्हणून 'कोलावरी डी'नं धुमाकूळ घातला होता. खास तरुणाईची म्हणून सुंदर सुरावटींची अनेक अर्थपूर्ण गाणी प्रसून जोशी, स्वानंद किरकिरे, ए.आर. रहेमान आदी मंडळी देत आली आहेत आणि ती लोकप्रियही झाली आहेत.

साधारण पंधराएक वर्षांपूर्वी टीव्ही चॅनेलवर 'रिॲलिटी शो'चा जमाना सुरू झाला. सूरसम्राट, सारेगम, इंडियन आयडॉल, इंडिया की आवाज वगैरे शो सुरू झाले. भारतातल्या अनेकविध राज्यांमधून आलेली नव्या दमाची तरुण मंडळी लोकप्रिय गायकांची गाणी हुबेहूब गाताना दिसू लागली. त्यांच्या जादुई आवाजाला, दिलचस्प अदाकारीला देशभरातल्या प्रेक्षकांकडून मोठ्या प्रमाणावर दाद मिळू लागली. एसएमएसच्या व्होटिंगचं राजकारण रंगू लागलं. त्यांच्या कलागुणांचं परीक्षण करणारी संगीतक्षेत्रातील दिग्गज मंडळी त्यांचं तोंडभरून कौतुक करू लागली. त्यातल्या चांगल्या आवाजाची देणगी अन् गाण्याची समज लाभलेल्या श्रेया घोषाल, सुनिधी चौहान, सोनू निगम आदी गायकांनी स्वतंत्रपणे पार्श्वगायन सुरू केलं. त्यांचीही गाणी लोकप्रिय झाली. चाहतावर्ग निर्माण झाला. पण हे सारं अभावानं घडलं. अभिजीत सावंतसारखे अनेक इंडियन आयडॉल 'गुमनामी के अंधेरेमें' दिसेनासे झाले. बराचसा, चांगल्या गाऊ शकणाऱ्या गायक-गायिकांचा वर्ग लोकप्रिय गायकांच्या गाण्यांच्या नकलेत अडकला आणि संपला. आजही वेगवेगळ्या नावाखाली हे शोज् चालूच आहेत, परंतु ह्या राष्ट्रीय पातळीवरच्या संगीत घुसळणीतून ज्यांच्या कामगिरीचा आवर्जून उल्लेख करता येईल असे दर्जेदार संगीतकार-गायक मोठ्या प्रमाणावर निर्माण होऊ शकले नाहीत हे मोठंच दुर्दैव म्हणावं लागेल आणि संगीतक्षेत्रातल्या ह्या भाकड अवस्थेमध्ये लोकांच्या ओठांवर ८-१५ दिवस खेळणाऱ्या तद्दन बाजारू फिल्मी गाण्याचं अमाप पीक निघू लागलं आणि ते गायला अर्थातच कुठल्या संगीत शिक्षणाची-गुरूची गरज गायकांना वाटेनाशी झाली.

आज लता-आशाचं पार्श्वगायन जवळपास थांबलं आहे. कविता कृष्णमूर्ती, अनुराधा पौडवाल, अलका याज्ञिक, फारसं

गात नाहीत. सुरेश वाडकर, सोनू निगम आदी काही मंडळी गाण्यापेक्षा टीव्ही अन् स्टेज शोमध्ये बिझी असतात. हल्लीचं मराठी सिनेसंगीतही फारसं लोकप्रिय व श्रवणीय नाही. त्यामुळे अशा अंधकारमय अवस्थेत नेमकं काय ऐकायचं हा फिल्मी सिनेसंगीताच्या शौकिनांपुढे मोठाच प्रश्न आहे. मी जेव्हा जेव्हा गाण्यांचे रिॲलिटी शोज् पाहतो तेव्हा मला असा प्रश्न पडतो, की आशा-लता-रफी-किशोर आदी महान कलावंतांनी आपापल्या दैवी सुरात गाऊन अजरामर करून ठेवलेली गाणी पुन्हा दुसऱ्या कुणाच्या आवाजात ऐकण्यात काय गंमत आहे? तरुण गायक-गायिकांच्या आवाजात ही गाणी ऐकल्यावर प्रेक्षकही मोठी दाद देतात, 'अगदी डिट्टो आशा भोसलेंसारखी गाते हो ही मुलगी!'' हा आणखी कडेलोट! एकदा आशाताईंनीच एका मुलाखतीमध्ये ''ही सारी मुलं गुणी आहेत. मेहनती आहेत. पण ही सारी आमचीच गाणी गातात. त्यांची स्वत:ची गाणी कुठायत?'' असा सवाल केला होता. जन्मजन्मांतरीची साथ देणारी शेकडो सदाबहार गाणी आशाताईंनी गायलीत. अगदी ऑऽऽईये... मेहरबा..पासून ते, हे दम मारो दम...पर्यंतच्या त्यांच्या सर्व गाण्यांवर लोकांनी प्रचंड प्रेम केलं. मला एक किस्सा आठवतो. 'इजाजत' चित्रपटासाठी गुलजार गीत लिहीत होते. एके दिवशी त्यांनी आर.डी. बर्मनच्या हातात एक गाणं ठेवलं- 'मेरा कुछ सामान... तुम्हारे पास पडा है...' आर.डीं.नी ते गाणं वाचलं अन् वैतागून त्राग्यानं ते गुलजारला म्हणाले, ''अरे! क्या ये लिखा तुमने मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा है... कल तुम कहोगे टाइम्स ऑफ इंडियामें ये एक न्यूज आयी है उसे कंपोझ करो। ये मुझसे नहीं होगा...'' अस म्हणत त्यांनी गाणं परत केलं. गुलजार त्याला शांतपणे म्हणाले, ''ये गाना गौर से पढो। सोचो...। महसूस करो और ये गाना सिर्फ तुमही कर सकते हो।'' अन् आशाच्या जादुई सुरातलं ते अजरामर प्रेमभरं विरहगीत जन्माला आलं. ही संगीतकाराची-गायकाची प्रतिभा! गाणं फक्त गळ्यातून नाही तर डोक्यातून आणि हृदयातून यावं लागतं. असं गाणं त्या गायकाचं आपलं स्वत:चं असतं. एका वृत्तपत्राला रिॲलिटी शोज्च्या संदर्भात मुलाखत देताना खुद्द पंडित हृदयनाथ मंगेशकरांनी 'दुसऱ्या गायकाचं गाणं गायचं म्हणजे गुलामगिरी करण्यासारखं आहे' असं विधान केलं होतं. अर्थात यातला विरोधभास असा, की अशी सारी मंडळी कुठल्यानं कुठल्या रिॲलिटी शोज्मध्ये परीक्षक म्हणून काम करताना आणि गुलामांची संख्या वाढवताना दिसतात! आज संगीतक्षेत्रातली जी काही थोडीफार मातब्बर



मंडळी आहेत ती सारी अशा कार्यक्रमांतून सर्रास 'तुझा सूर जरा कणसूर लागला...! तुला जरा दमसाँस वाढवायला हवा..' असं मार्गदर्शन करताना दिसतात. काही वेळा स्पर्धकांना 'अमेझिंग... माईंड ब्लोईंग... असा आवाज, असा सूर मी माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच ऐकला! तुझा भविष्यकाळ उज्ज्वल आहे,' असं म्हणत तोंडभरून आशीर्वाद देतात. त्यावर तरुण गायकमंडळी गदगद होऊन स्टेजवरच लोटांगण घालतात. अशा प्रकारे सुखनैव चालणारा संगीतक्षेत्रातला भ्रष्टाचार पाहून नेमकं कोण गाणं शिकतं आणि कोण शिकवतो हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. काही एपिसोडपुरत्या निर्माण झालेल्या ह्या गुरूशिष्यांच्या नात्यातून गाणंही फुलत नाही आणि नव्या गायकाचं काही आश्वासनही मिळत नाही. आज मालिकांची शीर्षकगीतं गाण्यांसारखी लोकप्रिय होताना दिसतात आणि आघाडीचे संगीतकार-गायक जाहीर कार्यक्रमांतून वन्समोअर घेत ही शीर्षकगीतं सादर करतात. अशा प्रकारांमुळे संगीतक्षेत्रातील 'घसरण' वाढतच राहते. आज दूरचित्रवाणी आणि रेडिओवरून शास्त्रीय संगीत जवळपास हद्दपार झाल्यासारखं झालं आहे. प्रसारमाध्यमांनी शास्त्रीय संगीताला मोहंजोदारोचं स्थान देऊन टाकलंय. एखाद्या संस्कृतीचा जसा अभिमान असतो तसाच अभिजातपणाही असतो. संगीतशिक्षणाची संस्कृती, गुरूशिष्य परंपरा जशी हळुहळू लयाला जातेय तसतसं अभिजात गाणं हे कानावर पडेनासं झालं. पंडित भास्करबुवा बखले, भातखंडे, गोविंदराव टेंबे आदी संगीतक्षेत्रातील दिग्गज मंडळींपासून कुमारगंधर्व, डॉ. वसंतराव देशपांडे, पं. भीमसेन जोशी अशा असंख्य प्रतिभाशाली गानरत्नांची प्रभावळ अजूनही अबाधित आहे. आज मूठभर जाणकार रसिक शास्त्रीय संगीताचा आनंद लुटताना दिसतात. प्रश्न असा आहे, की आजच्या तरुणाईला हे गाणं ऐकायचं आहे का? गेल्या अनेक दशकांपासून आपण येणाऱ्या पिढ्यांना संगीतसाक्षर करण्यात अपयशी ठरलो आहोत. वर्षानुवर्षं करावी लागणारी संगीतशिक्षणाची कठोर तपश्चर्या, तालमी अन् रियाज याला संगीतात पर्याय नाही ही जाणीव तरुणाईला करून देणं गरजेचं आहे. अर्थात अभिजात सुंदर गाणं नवीन गायकांना द्यायचं असेल अन् रसिकांना ते ऐकायचं असेल तर..! कारण आता तानसेन आणि कानसेन दोन्ही दिसेनासे झालेत! आता उरल्या आहेत चांगल्या गाण्याच्या नकला आणि गाण्याच्या नावानं होणारी काव् काव्..!

**- रविराज गंधे**
५८/८ वसंतस्मृती, पांडुरंगवाडी,
गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६३
भ्रमणध्वनी : ९८२०३७८४४८
ravirajgandhe@gmail.com



प्रभाकर वाईरकर

## ओळख व्यंगचित्रकाराची

# भिरभिरते फुलपाखरू–सुभानी

**प्रभाकर वाईरकर–**व्यंगचित्रकार

कोषातून बाहेर आलेले फुलपाखरू आपल्या इवल्याशा पंखांमध्ये सर्व ताकद एकवटून, या फुलावरून त्या फुलावर इच्छित मधुगंध गोळा करत जसे स्वच्छंदी भिरभिरते, त्याचप्रमाणे शालेय शिक्षण पूर्ण केल्यावर एकेक फुलपाखरू आपल्या इच्छाशक्तीच्या पंखांमध्ये बळ एकवटून महाविद्यालयाच्या बगीच्यातल्या नृत्य, गायन, खेळ, संगीत, नाटक, चित्रकला, वक्तृत्व–संभाषण, लेखन इत्यादी फुलांवरून भिरभिरते आणि आवडीचा मधुगंध मिळणाऱ्या फुलावर स्थिरावते.

असेच एक फुलपाखरू आंध्रप्रदेशातील शेतीची हिरवीगार शाल पांघरलेल्या 'करमचेडू' या खेड्यातून भिरभिरत महाविद्यालयातील बगीच्यातल्या चित्रकलेच्या फुलावर स्थिरावले. त्याचे नाव 'सुभानी शेख... सुभानी!'

उपजतच चित्रकलेची आवड असल्याने, महाविद्यालयात सायन्स शाखेत अभ्यास करताना त्यासाठी लागणारी आरेखने–आकृत्या काढण्यात त्यांचे मन रमू लागले. इतर मुलांमध्ये नसणारा हा 'गुण' सुभानी यांना त्या महाविद्यालयात विशिष्ट वलय निर्माण करता झाला. त्या वलयाभोवती कॉलेजमधील शिक्षक, मुले–मुली आकर्षित झाल्याने त्यांच्यामध्ये उत्साहाची ऊर्जा निर्माण झाली. सुभानी ह्यांचे हात कॉलेजच्या फळ्यावर, नोटीस बोर्डावर लावलेल्या चित्रांमधून, मित्र–मैत्रिणींच्या प्रोजेक्टसाठी केलेल्या आकृत्यांमधून ब्रश–पेन याने सहज फिरू लागले. केमिस्ट्रीचा अभ्यास करता–करता ब्रश–पेन, शाई व रंग यांची केमिस्ट्री



सुभानी शेख

जुळून यायला लागली. कॉलेजमध्ये ज्या–ज्या ठिकाणी चित्रकलेची आवश्यकता असेल त्या ठिकाणी सुभानी यांचे चित्र असणारच, हे पक्के झाले.

फावल्या वेळात ते कॉलेजच्या लायब्ररीमध्ये जाऊन वर्तमानपत्रे चाळून त्यातील व्यंगचित्रे न्याहाळू लागले व त्याचवेळी त्यांची ओळख प्रसिद्ध व्यंगचित्रकारांच्या– बापू, जयदेव आणि सत्यामूर्ती यांच्या कलाकृतीशी झाली. ती व्यंगचित्रे अतिशय बारकाईने पाहून त्यांनी व्यंगचित्रे काढायला सुरुवात केली व वेगवेगळ्या तेलुगू मॅगेझिनमध्ये पाठवायला सुरुवात केली. त्याचवेळी विविध स्पर्धांमध्ये ते भाग घेऊ लागले व त्यांना अनेक पारितोषिके मिळाली. या पारितोषिकांतून, मिळालेल्या पैशांमधून ते ज्यांच्यामध्ये व्यंगचित्रे व इलेस्ट्रेशन्स (चित्रे) असतील अशी पुस्तके खरेदी करू लागले.

चित्रकलेचे शास्त्रशुद्ध धडे गिरवले नसले तरीही त्यांची अनेक सुंदर चित्रे विविध तेलुगू नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध होऊ लागली. आंध्रभूमीच्या 'ज्योथी' दिवाळी अंकामधून त्यांचे पहिले व्यंगचित्र प्रसिद्ध झाले आणि हळुहळू अनेक मॅगेझिनमधून त्यांची व्यंगचित्रेही प्रसिद्ध होऊ लागली.

सायन्समधून पदवी घेतल्यानंतर एका उच्च परीक्षेसाठी ते हैदराबादमध्ये आले व त्या ठिकाणी श्री. शंकू प्रकाशित करत असलेल्या 'हास्यप्रिया'मधून त्यांची व्यंगचित्रे प्रसिद्ध होऊ लागली. यामुळेच त्यांची १९८५ साली 'इलेस्ट्रेटर–कार्टुनिस्ट' या पदासाठी 'आंध्रभूमी' साप्ताहिकामध्ये निवड झाली. त्यात त्यांनी अंदाजे ५००० चित्रे कथांसाठी व मालिकांसाठी चितारली.

दोन्ही क्षेत्रांतील त्यांची भरारी 'डेक्कन क्रॉनिकल'चे मॅनेजिंग डायरेक्टर टी. वेंकटराम रेड्डी यांना भावली व त्यांनी १९९० साली डेक्कन क्रॉनिकल या दैनिकामध्ये त्यांची व्यंगचित्रकार म्हणून नेमणूक केली. त्या ठिकाणी त्यांची घोडदौड आजपर्यंत चालू आहे.

आधी उल्लेख केलेल्या भारतीय व्यंगचित्रकारांचा जसा त्यांच्यावर प्रभाव पडला तसाच तो परदेशी व्यंगचित्रकारांचाही पडला. त्यात जगप्रसिद्ध कॉमिक्स–ॲस्ट्रिक्सचे चित्रकार अल्बर्ट उडेरझो (Uderzo) आणि हँक केचमन आणि सर्वपरिचित जगप्रसिद्ध–कॉमिक्स–'डेनिस–मेनिस'चे कर्ताकरविता चित्रकार मार्कस हॅमिल्टन यांचा विशेष प्रभाव होता.

त्यांच्या स्टाईलवरूनच कळून येते की ही सुभानी यांची व्यंगचित्रे आहेत. त्याला

सहीची गरजही भासत नाही. त्या सर्व व्यंगचित्रकारांच्या शैलीचा अभ्यास करून त्यांनी स्वत:ची अशी एक 'स्टाईल' निर्माण केली आहे की जी कोणाही चित्रकारापेक्षा कमी दर्जाची नाही. ज्या ज्या व्यंगचित्रकारांनी चित्रकलेचे शिक्षण न घेताही व्यंगचित्रकला जोपासली त्यामध्ये चित्रकलेची जी परिमाणे आहेत त्यांचा वापर केलेला दिसून येत नाही. परंतु सुभानी यांच्या चित्रांमध्ये एखाद्या पट्टीच्या चित्रकाराप्रमाणे परिमाणांचा पुरेपूर वापर केलेला आढळतो.

त्यांचे प्रत्येक व्यक्तिचित्र त्यांनी जी प्रमाणबद्धता तयार केली आहे त्यामध्ये पुरेपूर उतरते. परस्पेक्टिव्ह हा त्यांच्या चित्रांचा स्थायीभाव आहे, जो इतर व्यंगचित्रकार टाळतात. चेहऱ्यावरचे भाव, ॲक्शन्स, कपड्यांवरील चुण्या हे सर्व अगदी पटाईत चित्रकारांप्रमाणे ते रेखाटतात. त्यांनी स्पॉटवर जाऊन तयार केलेली चित्रे अप्रतिम आहेत. त्यांनी आतापर्यंत तीन पुस्तके प्रकाशित केली आहेत- १) दी ड्राइव्ह, २) पॉईंट-काउंटरपॉईंट व ३) आदाब हैदराबाद.

'आदाब हैदराबाद'मधील चारमिनारच्या परिसरात घडणाऱ्या घटना, रस्त्यावरच ठाण मांडलेले फेरीवाले, पोलिसांचा ट्रॅफिकवर नसलेला कंट्रोल, रस्त्यावर झोपून चारमिनारचा फोटो घेणारा बेशिस्त अवलिया, बसच्या समोरून म्हशीवर बसून जाणारे कारटे असे अस्ताव्यस्त हैदराबादचे जीवन अतिशय मोजक्या व परिणामकारक रेषांमधून त्यांनी चितारले आहे. परस्पेक्टिव्हचा वापर व व्यक्तीवरचे भाव योग्य असेच. सुभानी पेनने चित्र तयार करतात. त्यांनी फक्त लाइन्स मारून तयार केलेले रवींद्रनाथ टागोरांचे चित्र त्यांची 'पेनवर' किती हुकमत आहे हे दर्शवते. प्रत्येक लाइन स्वच्छ अशीच...


वर्तमानपत्रामध्ये सुभानी पॉकेट कार्टून्स काढतात. कधीमधी मुख्य व्यंगचित्र.




पॉकेट कार्टून्समध्ये जसे राजकीय विषय हाताळतात तसेच सामाजिक बांधिलकीचे विषयही.

जीडीपीची ९ टक्के वाढ होत नाही ह्याची चिंता करणाऱ्या मनमोहनसिंगांना १०० टक्के वाढ कोणत्या गोष्टीमध्ये झाली आहे याची जाणीव करून देणारा सामान्य माणूस त्यांच्यावर कसा कुरघोडी करतो हे त्यांनी मार्मिकपणे दर्शवले आहे.

सामाजिक प्रश्न हाताळताना सध्याचे जग टेक्नॉलॉजीमध्ये किती पुढारले आहे यावरचे व्यंगचित्र म्हणजे घरामध्ये सोफ्यावर बसून गप्पागोष्टी करणाऱ्या कुटुंबाच्या पुढ्यात अचानक 'रोबो' कुत्र्याचे आगमन आणि त्याला घाबरून खऱ्या कुत्र्याची झालेली घाबरगुंडी हे बरेच काही सांगून जाते.




राजकीय नेते पोलिसांचा वापर घरगुती कामासाठी करून घेतात व त्याचे परिणाम त्याच नेत्यांना भोगावे लागतात याचे उदा. I have forgotten how to use the gun...या व्यंगचित्रामध्ये अतिशय मार्मिकतेने दाखवले आहे.

सुभानी कॅरिकेचरमध्येही माहीर आहेत. त्यांची कॅरिकेचरही उत्तम दर्जाची असतात. त्यांनी काढलेले, प्रसिद्ध गायक येशुदास यांच्या गायनाची ५० वर्षे दाखवणारे कॅरिकेचर बोलके आहे.

सुभानी यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कार मिळाले. परंतु त्यांच्या कारकिर्दीत जे दोन प्रसंग घडले त्यांचा त्यांना कधीही विसर पडत नाही. त्याबाबत ते सांगतात,

''एन.टी. रामाराव यांचे जावई चंद्रबाबू नायडू. ते एन.टी.आर. यांच्याविरुद्ध बंड करून उभे ठाकले होते. त्यांचा मुक्काम व्हाइसरॉय या हॉटेलमध्ये अन्य सहकाऱ्यांबरोबर होता. त्याच दिवशी सूर्यग्रहण होते. या प्रसंगाचा उपयोग करून मी सहा भागांमध्ये सदर व्यंगचित्र चितारले. पहिल्या भागापासून हळुहळू सरकत जाणारी चंद्रबाबू यांची काळी छाया (ग्रहण) एन.टी. आर. यांच्यावर म्हणजेच सूर्यावर येत असते आणि शेवटच्या भागामध्ये त्याच काळ्या गडद छायेवर (एन.टी.आर.) सूर्य तळपतो, हसऱ्या मुद्रेने. विजयी अविर्भावात! (पण प्रत्यक्षात तसे झाले नाही. एन.टी.आर.यांचा पराभव झाला.) हे व्यंगचित्र पहिल्या पानावर झळकले. सकाळीच मला एन.टी.आर. यांचा फोन आला. मी चक्रावलो. ते म्हणाले, 'आजचे व्यंगचित्र अप्रतिम, मित्रा. ही तुझी भविष्यवाणी खरी ठरो.' मला जगातले पहिले बक्षीस मिळाल्याचा आनंद झाला. हे सांगितल्यावर अनेकांनी माझी पाठ थोपाटली. घरातील सर्व सोनेरी किरणांनी न्हाऊन गेल्यासारखे वाटले. क्षणभर!

''दुसरा प्रसंगही माझ्या मनात घर करून राहिला. मदर तेरेसा यांचे देहावसान झाल्यावर मी एक व्यंगचित्र चितारले होते. अंदाजे ७५ वर्षे वय असलेली व्यक्ती माझ्याकडे साश्रू नयनांनी आली. मी घाबरलो, गोंधळलो... थोडा वेळ गेल्यावर ती व्यक्ती म्हणाली, तुम्ही जे मदर तेरेसांचे व्यंगचित्र काढले आहे त्याचे मूळ चित्र मला द्या! मला त्या व्यक्तीचा चेहरा आजही दिसतो. हा प्रसंग मला आजही आठवतो जसाच्या तसा... या प्रसंगाने मला ताकद दिली अधिकाधिक आशयबद्ध, परिणाम-कारक, सत्य समोर मांडणारी व्यंगचित्रे काढण्याची...''



सुभानी म्हणतात, ''व्यंगचित्रे ही कोणाच्याही भावना दुखावणारी असू नयेत. कोणतीही धार्मिक तेढ निर्माण करणारी वा शारीरिक व्यंगावर टीका करणारी नसावी. राजकीय व्यंगचित्रकारांनी सत्य परिस्थिती समोर ठेवून राजकीय नेत्यांचे समाजविघातक विचार बदलायला लावले पाहिजेत. तशी ताकद त्या व्यंगचित्रांमध्ये पाहिजे. जसे डेव्हिड लो या इंग्लिश व्यंगचित्रकाराच्या व्यंगचित्रांना साक्षात हिटलरही घाबरत असे. म्हणूनच त्याने फर्मान काढले होते की त्याला जिवंत वा मेलेला माझ्यासमोर हजर करा.''

ज्येष्ठ व्यंगचित्रकार शंकर पिल्ले यांना पंडित नेहरू नेहमी सांगत, 'माझं जरी काही चुकलं तरी मला सोडू नकोस, माझ्यावरही तू व्यंगचित्रातून आसूड ओढ.' अशा प्रकारचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य आजच्याही व्यंगचित्रकारांना आजचे नेते देतील अशी आशा सुभानी बाळगतात.

ते म्हणतात, ''मी वर्तमानपत्र वाचताना, टीव्ही पाहताना, मित्रांबरोबर बोलताना वा इतर काहीही विचार करताना व्यंगचित्रांसाठी मला कल्पना सुचतात. कधी कधी राजकीय व्यंगचित्र करताना मेंदू एकदम ब्लॉक होतो. काहीही कल्पना सुचत नाहीत. अशावेळी मी सामाजिक विषय घेऊन व्यंगचित्र रेखाटतो.'' मला वाटते, राजकीय व्यंगचित्रकारांना ही महत्त्वाची 'टीप' आहे.

त्यांना लालूप्रसाद यादव, मुलायमसिंग, मायावती यांची कॅरिकेचर करायला मजा येते. व्यंगचित्रकारांमध्ये कोणीही व्यंगचित्रकार त्यांचा विशेष आवडता असा नाही. जो जो चांगले काम करतो तो त्यांचा आवडता व्यंगचित्रकार.

''ज्या व्यंगचित्रामध्ये कल्पना चांगली असते, त्यातील उपहास आणि रेषा परिणामकारक होतात. ते माझे आवडते व्यंगचित्र व त्यावेळी मी खूप समाधानी असतो,'' असं ते सांगतात.

भावी व्यंगचित्रकारांना पुष्कळ संधी आहेत असे ते म्हणतात. ॲनिमेशनचे दरवाजे सताड उघडे आहेत. शिवाय टीव्हीवरही अनेक चर्चात्मक कार्यक्रम असतात, त्यामध्येही व्यंगचित्रांचा वापर केला जातो.

सुभानी यांना अनेक पुरस्कार मिळाले. २०१० साली 'युधीर ॲवार्ड' पत्रकारितेमध्ये उत्कृष्ट काम केल्याबद्दल. एड्स कंट्रोल सोसायटीचे पहिले पारितोषिक. ग्रीस, चीन, कोरिया, बेल्जियम, इराण या देशांमधील अनेक मानांकित बक्षिसे त्यांना मिळाली आहेत.

असा हा गुणी व्यंगचित्रकार सायन्स-मधील गुंतागुंतीच्या आकड्यांना, निर्जीव केमिस्ट्रीला सोडचिठ्ठी देऊन जीवनातील रंग-रेषा, अनेकांकडून मिळालेल्या प्रेरणा आणि अनुभव यांची गाठोडी घेऊन समाजातील सत्य, भाव-भावना, न्याय-अन्याय यांची केमिस्ट्री जुळवण्यासाठी व्यंगचित्रात्मक मार्गावरून आपली अखंड वाटचाल करत आहे...

**सुभानी शेख**
subhani61@yahoo.com

**- प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी-४०५, वाकोला ब्रीज,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९
prabhakarwairkar@rediffmail.com

# असामान्य अभिनेता

## अपर्णा पाटील

ऑस्करच्या इतिहासात अभिनयासाठी सर्वाधिक पुरस्कार मिळवणारी अभिनेत्री आहे, कॅथरिन हेपबर्न. त्यानंतरच्या स्थानावर जाऊन पोहोचलाय तो डॅनियल डे-लुईस. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांची भूमिका केलेल्या डॅनियल डे-लुईसला नव्या भूमिकेत इतक्यात तरी पाहता येणार नाही. अब्राहम लिंकन यांच्या जीवनातला शेवटचा काळ रंगवताना डॅनियलनं जे काही केलं ते पडद्यावर दिसलं. पाय न उचलता चालण्याची विशिष्ट ढब, केंटूकी भागातील उच्चार, मधे-मधे ऐकू न येणारा आवाज आणि त्याहीपेक्षा भेदक डोळे. डॅनियलनं रंगवलेला लिंकन म्हणून आपला वेध घेतो.

स्टिव्हन स्पिलबर्गच्या 'लिंकन' या सिनेमाचं यश कशात आहे, या प्रश्नाला अनेक उत्तरं असतील, पण 'लिंकन' का भावला, याचं उत्तर मात्र एकच असतं ते म्हणजे अभिनेता डॅनियल डे-लुईस. डॅनियल डे-लुईसनं 'लिंकन' साकारण्यासाठी जी काही मेहनत केलीय, तिचं चीज झालंय. पण त्याहीपेक्षा अब्राहम लिंकन यांच्या व्यक्तिमत्त्वामधला मानवी धागा अधोरेखित करण्याचं महान काम त्यानं केलंय. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून अब्राहम लिंकन यांची कारकीर्द, यादवी युद्ध आणि गुलामगिरीसारख्या मोठ्या समस्येचं उच्चाटन करण्यासाठी केलेले प्रयत्न, त्यासाठी दाखवलेलं राजकीय मुत्सद्दीपण आणि पती-पिता अशा सगळ्या पातळ्यांवरचा त्यांचा व्यवहार डॅनियलनं जिवंत केलाय. त्यामुळेच 'लिंकन' हा सिनेमा राहिलेला नाही, तो जणू एक ऐतिहासिक दस्तावेज झाला आहे. याचं सारं श्रेय डॅनियल डे-लुईसला जातं. पुरस्कारांची बरसात त्याच्यासाठी नवी नाही. बोटांवर मोजता येतील एवढेच सिनेमे करणारा डॅनियल पुरस्कारांची मोजदाद ठेवत नाही. 'लिंकन'साठी तर त्याला सगळे पुरस्कार मिळालेत.


डॅनियल मायकल ब्लेक डे लुईस अशी ओळख जर कोणी आपल्याला करून दिली तर कदाचित लक्षात येणार नाही, पण मार्लन ब्रॅंडोनंतरचा आजच्या घडीचा सगळ्यात आदरणीय कलाकार, असं विशेषण लावलं तर कदाचित लक्षात येईल. तीन वेळा ऑस्कर मिळालेल्या डॅनियलचा जन्म अभिनय करण्यासाठी झाला असं कोणी सांगितलं असतं तर विश्वास बसला नसता. त्यानं पहिल्यांदा सिनेमासाठी कॅमेरा फेस केला तेव्हा पुढच्या दशकातला तो महान कलावंत असेल याची कल्पनाही कोणी केली नव्हती. तारुण्यात पदार्पण करणारा डॅनियल जेव्हा बंडखोरी करून वाया जाण्याच्या बेतात होता, तेव्हा त्याला आपल्यापासून दूर ठेवण्याचा निर्णय त्याच्या पालकांनी घेतला नसता तर आजचा डॅनियल घडलाच नसता.

आपल्या मोठ्या बहिणीमुळे अभिनयाकडे आपलं करिअर म्हणून पाहणारा डॅनियल सध्याच्या घडीचा महान कलावंत आहे. त्याची जडणघडण होण्यात त्याचं आयरिश-ज्यू असणं, आईचं अभिनेत्री असणं हे जितकं प्रभावशाली ठरलं तितकीच प्रेरणादायी ठरली ती स्वतःच्या भूमिकेसाठी केलेली पूर्वतयारी. भूमिकेसाठी वजन कमी

---

डॅनियल डे-लुईसनं 'लिंकन' चित्रपटातील भूमिकेसाठी ऑस्कर मिळवलंय. हे त्याचं तिसरं ऑस्कर. अशी हॅटट्रिक साधणारा तो सिनेमाच्या इतिहासातला पहिलाच अभिनेता. ५५ वर्षांच्या या अभिनेत्यानं गेल्या पंधरा वर्षांत फक्त सहा सिनेमे केले! ऑस्कर मिळाल्यानंतरही बॅकस्टेजला त्यानं, आता काही वर्षं विश्रांती घ्यायला हवी असं सांगून, नजीकच्या भविष्यात त्याची अदाकारी पाहायला मिळणार नाही हे सांगून टाकलंय. तोवर 'लिंकन' हाच चर्चेचा विषय राहील.

---



करणं, वाढवणं इतक्या मर्यादित तयारीची यादी असलेल्या कलावंतासमोर डॅनियल म्हणजे उत्तुंग शिखर. वर्षातून एक सिनेमा करणारे कलावंत इथे डोक्यावर घेतले जातात. डॅनियल तर पाच-सात वर्षे लोकांच्या नजरेसही पडत नाही. कारण त्याला चांगल्या भूमिका मिळणार नाहीत, याची भीती नसते, तर चांगली भूमिका त्याच्यासाठी थांबून राहते. 'लिंकन' सिनेमातल्या प्रमुख भूमिकेचा प्रस्ताव त्याला पहिल्यांदा आला तेव्हा तो त्यानं नाकारला होता. स्पिलबर्गला तो सिनेमा दुसरा कलावंत घेऊन करता आला असता पण तसं झालं नाही.... यासाठी डॅनियल डे-लुईस म्हणजे काय चीज आहे, समजून घ्यावं लागतं.

सेसिल डे-लुईस अँग्लो-आयरिश कवी. इंग्लडमध्ये त्यांचं कुटुंब स्थाईक झालं, तेव्हा सेसिल फक्त दोन वर्षांचे होते. ब्रिटन हीच त्यांची कर्मभूमी झाली. पुढे त्यांनी ज्युईश जिल बाल्कनशी लग्न केलं केलं, तेव्हा कवी आणि कलावंत असा सुरेख संगम डे लुईस घराण्यात झाला. कारण जिलचे वडील सर मायकल बोल्टन हे एलिंग स्टुडिओचे प्रमुख होते आणि जिल अभिनेत्री.

डे-लुईस कुटुंब काही फार श्रीमंत नव्हतं, पण कलेशी संबंधित होतं. ग्रीनिव्हचमध्ये राहणं हे डॅनियलच्या पुढच्या आयुष्याचा पाया पक्कं करणारं होतं. त्याचं ज्युईश असणं तसं प्रवाहापासून वेगळं राहण्यास भाग पाडणारं होतं. कारण त्याचे उच्चार, शिष्टाचार हे ब्रिटनमधल्या स्वतःला सर्वश्रेष्ठ समजणाऱ्या समाजापेक्षा वेगळे होते. अशावेळी एक तर त्यांच्याशी फटकून राहणं चांगलं किंवा त्यांच्यात मिसळून जाणं, यात शहाणपणा होता. लहानग्या डॅनियलनं दुसरा मार्ग पत्करला. त्या वयाची ती गरज होती; पण तोच डॅनियलच्या कलाशिक्षणातला पहिला धडा होता.

मनस्वी कलावंत असलेल्या वडिलांचं आयुष्य मुलांच्या आयुष्यावर नकळत परिणाम करणारं ठरलं. लेखक असलेल्या वडिलांची चारही मुलं आपआपल्या परीनं वाढत राहिली. डॅनियलनं कधी त्याचा उच्चार केला नाही पण त्याच्या मोठ्या बहिणीनं मात्र, 'वडिलांनी त्यांच्या आयुष्यात मग्न असणं आमच्यावर परिणाम करणारं होतं', असं कुठेतरी म्हटलंय. कदाचित हीच बाब त्याच्यात बंडखोरी निपजण्यात झाली. समाजात मान असलेल्या सेसिल डे-लुईस यांचा मुलगा म्हणून डॅनियलकडे काही गोष्टी आपसूक आल्या होत्या तर काही वयात येण्याच्या बदलांमुळे. दहा वर्षांच्या डॅनियल-मध्ये झालेले बदल त्याच्या पालकांनाही अस्वस्थ करून गेले होते. छोट्या-मोठ्या चोरीत त्याला आनंद मिळत होता. आपल्या मुलाला त्याचं काय चुकतंय, हे सांगण्याचा एकच मार्ग होता, तो म्हणजे त्याला बोर्डिंग स्कूलमध्ये पाठवणं. केंटमधलं सेव्हेनोक स्कूल त्याला आवडलं नसलं तरी त्याच्यातल्या आवडीच्या तीन गोष्टींशी त्याचा परिचय तिथेच झाला. काष्ठशिल्पकला, अभिनय आणि मासेमारी. दोन वर्षं त्या शाळेत काढल्यानंतर पुन्हा एकदा दुसरी शाळा त्याच्या वाट्याला आली. इथे एक बरं होतं, ते म्हणजे त्याची बहीण याच शाळेत शिकत होती. तारुण्यात पदार्पण करण्याच्या वयामुळे घोंगावणारं बंडखोरीचं वादळ जरा शांत झालं. गुन्हेगारीकडचं वळण अभिनयाकडे झुकलं.

हॅम्पशायरमधल्या बिडेल्स शाळेत असतानाच डॅनियलचा अभिनय नावाच्या गोष्टीशी परिचय झाला. पडद्यावर झळकण्याची पहिलीवहिली संधीही मिळाली. त्याच्या फिल्मोग्राफीतला पहिला सिनेमा संडे बल्डी संडे इथेच असताना मिळाला. कोणालाही अशी संधी वयाच्या चौदाव्या वर्षी मिळाल्याचं कौतुक वाटेल, पण डॅनियलचं मात्र उलटंच. या सिनेमात त्याला एका गाडीची तोडफोड करण्याचं छोटंसं काम मिळालं होतं. स्थानिक चर्चच्या बाहेर उभी केलेल्या महागड्या गाडीची तोडफोड करण्यासाठी दोन पौंड मानधन मिळणं, हे म्हणजे त्याच्यालेखी स्वर्गसुखच.

अठराव्या वर्षी डॅनियलला करिअर-साठी अभिनय निवडावा हे भान आलं. त्यानं लंडनच्या नॅशनल यूथ थिएटरमध्ये नाट्यप्रशिक्षण घेतलं. त्यानंतर बिस्ट्रोल ओल्ड विक स्कूलमध्ये तीन वर्षांचं प्रशिक्षण. अशी पायाभरणी करून डॅनियल आता अभिनयच करणार, हे निश्चित झालं. नाटक आणि टीव्ही दोन्ही करत त्याची गाडी चालली होती. त्यानं बीबीसीसाठी 'हाऊ मेनी माइल्स टू बॅबिलॉन' केलं. पहिल्या महायुद्धाच्या काळात ब्रिटन की आयर्लंड अशा द्विधा मनस्थितीत सापडलेल्या जवानाची भूमिका होती ती. डॅनियलचं आयरिश असणं आणि ब्रिटिश नागरिक म्हणून वावरणं, ही भूमिका साकारण्यास फायद्याचं ठरलं. अर्थात मोठा पडदा त्याच्यापासून दूरच होता.

रिचर्ड ॲटनबरोंचा गांधी सिनेमा एक महत्त्वाकांक्षी प्रोजेक्ट होता. त्यात आजच्या डॅनियलच्या वाट्याला कदाचित महत्त्वाची भूमिका आली असती, पण त्या सिनेमात त्यानं अगदी किरकोळ भूमिका केली होती. कोलिन नावाच्या त्या भूमिकेत तो काही सेकंद वावरला. ते वर्ष होतं १९८२. सुरुवात अशी क्षुल्लक भूमिकेनं झाली असली तरी ते वर्ष त्याच्यासाठी महत्त्वाचं होतं. या वर्षाच्या अखेरीस त्याला 'अनदर कंट्री'मध्ये प्रमुख भूमिका मिळाली होती. ही भूमिका त्याला थेट रॉयल शेक्सपीयर कंपनीची दारं उघडवून देणारी ठरली. 'रोमिओ अँड ज्युलिएट'मध्ये रोमिओची आणि 'ए मिडसमर नाइट्स ड्रीम'मध्ये फ्लूटची भूमिका मिळणं, डॅनियल की निकल पडी... असा संकेत देणारं होतं. शेक्सपीयरच्या भूमीत, त्याच्या नाटकात महत्त्वाची भूमिका मिळणं याहून कलाकाराला काय हवं.

सिनेमा मिळणं आता दूर नव्हतं. 'ए रूम विथ अ व्ह्यू' हा सिनेमा खरं तर वूमन ओरिएंटेड होता, पण डॅनियलनं आपली दखल घ्यायला लावलीच. मर्चंट आयव्हरीचा तो कॉश्च्युम ड्रामा होता, मग थेट 'द अनबेरेबल लाइटनेस ऑफ बीईंग' मिळाला. 'माय ब्युटिफूल लाँड्रेट'मध्ये त्यानं गे पंक

रंगवला होता. ए रूम विथ अ व्ह्यू हा सिनेमाही त्याचवेळी आला होता. पण दोन्ही भूमिकांत वावरणारा कलावंत एकच आहे, यावर विश्वास बसणं कठीण झालं होतं. त्याच्यातल्या अभिनेत्याला त्याचा आत्मा गवसला होता. मेथड अॅक्टर म्हणून ती फक्त सुरुवात होती. शिक्कामोर्तब होण्यासाठी 'माय लेफ्ट फूट' येणं बाकी होतं.

ख्रिस्टी ब्राऊन या अपंग कलाकाराचं आयुष्य मोठं आव्हानांनी भरलेलं. अपंगत्वाच्या जोडीला मानसिक दुबळेपणही. त्याचं आयुष्य पडद्यावर उभं करण्याचं आयरिश दिग्दर्शक जीम शेरेडीन यांनी ठरवलं. आयरिश असलेल्या डॅनियलकडे ख्रिस्टीची भूमिका सोपवली, तेव्हा तो पहिल्यांदा डब्लिनला गेला. तिथल्या सँडीमाऊंट स्कूल क्लिनिकमध्ये गेला. अपंग, मूकबधिरांमध्ये जाऊन राहिला. त्यांच्या हालचाली निरखल्या. सिनेमाच्या चित्रीकरणाच्या वेळी तो व्हीलचेअरवरून उतरायचा नाही. प्रसंगाचं चित्रीकरण संपलं तरी तो खरोखरच अपंग असल्याप्रमाणे वावरायचा. अनेकदा त्याच्या अशा वागण्यामुळे सेटवरच्या माणसांना तिथलं सामान हलवणं, कॅमेरे, लाइट्सच्या वायर्स हलवणं मुश्कील व्हायचं, पण डॅनियल व्हीलचेअरवर तसाच बसून राहायचा. कधी कधी तर आपल्याला अन्न भरवण्याचा हट्टही तो करायचा.

माय लेफ्ट फूट हा अतिशय भावनाविवश, व्याकूळ करून टाकणारा सिनेमा होता. डॅनियलनं आपलं काम चोख बजावलं होतं. त्यावर अन्य महत्त्वाच्या पुरस्कारांसह ऑस्करची मोहोर उमटली होती. मार्लन ब्रँडोनंतरचा ताकदीचा मेथड कलाकार म्हणून त्याचा गवगवा होऊ लागला तो तेव्हापासून. या सिनेमानंतर तो पुन्हा एकदा रंगभूमीकडे वळला. हॅम्लेटसाठी तो स्टेजवर उभा राहिला, पण एका प्रयोगाच्या ऐन मध्यंतरात तो कोसळला. थकव्यामुळे तो कोसळला होता. डॅनियल स्टेजवर ज्या प्रसंगाच्या वेळी कोसळला, तो प्रसंग होता हॅम्लेटला आपल्या वडिलांचं भूत दिसण्याचा.

प्रत्यक्षात डॅनियलला त्या प्रसंगात आपल्याच वडिलांचं भूत दिसलं होतं. आपल्याला ही गोष्ट खरीखोटी कशीही वाटो, पण डॅनियलनं ते खरंच होतं, असं एकदा जाहीरपणे सांगून टाकलं. त्यानंतर तो परत कधी रंगभूमीकडे वळला नाही हे मात्र खरं.

ऑस्करनंतर त्याला पुन्हा पडद्यावर पाहण्यासाठी तीन वर्षं लागली. 'द लास्ट ऑफ द मोहीकन्स' हा सिनेमा करण्यासाठी तो गृहपाठ करून आला होता. वजन वाढवणं हे तर होतंच, जंगलात जाऊन राहणं, मासेमारी, शिकार करणं हे सगळं त्यानं फक्त आणि फक्त आपल्या भूमिकेत खरेपणा यावा यासाठी केलं होतं. कोणाला मूर्खपणा वाटेल, पण सिनेमाचं चित्रण पूर्ण होईपर्यंत सेटवर तो मोठी रायफल घेऊन वावरत होता. प्राण्यांची कातडी कमावणंही त्यानं शिकून घेतलं होतं. सारं काही सिनेमासाठी, पडद्यावरच्या आपल्या दोन तासांच्या भूमिकेसाठी.



जीम शेरेडीननं 'इन द नेम ऑफ द फादर'साठी डॅनियलला पुन्हा बोलावलं. गेरी कॉनलॉनची भूमिका करण्यासाठी त्यानं मेहनत करणं हे अपेक्षितच होतं. शूटिंगच्या वेळी 'आपल्या अंगावर खरंच थंडगार पाणी टाकून खरोखर अपमान व्हावा, अशी शिवीगाळ करा', असं तो क्रू मेंबर्सना सांगत असे. काही काळ त्यानं जेलमध्ये राहण्याचा अनुभवही घेतला, सारं काही भूमिकेसाठीच.

दुसरं ऑस्कर, तिसरं बाफ्टाचं मानांकन त्याला मिळालं. तर गोल्डन ग्लोब पुरस्कारही.

'द एज ऑफ इनोसन्स'मध्ये मार्टीन स्कोरर्सिसनं त्याला न्यूलँड आर्करची भूमिका दिली. १८७०च्या काळामधील ती भूमिका साकारण्यासाठी १९९३साली तो न्यू यॉर्कच्या रस्त्यावर हातात काठी, हॅट अशा पेहरावात फिरत होता. त्यानंतर पुन्हा जीमनं त्याला 'बॉक्सर'साठी साइन केलं. त्यासाठी त्यानं थेट बॅरी मॅकगिआनकडून पंचिंगचे धडे गिरवले. या सिनेमांनंतर त्यानं जणू सिनेप्रवासात अर्धविराम घेतला. इटलीतल्या फ्लोरेन्सला जाऊन त्यानं शूमेकिंग शिकायला सुरुवात केली!

पाच वर्षांच्या कालावधीचा विराम म्हणजे कलाकारानं स्वतःहून स्वतःच्या कारकिर्दीला पूर्णविराम देणंच. पण हा विचार कधी डॅनियलनं केलाच नाही. पुन्हा एकदा स्कोरर्सिसनं त्याला 'गँग ऑफ न्यू यॉर्क'साठी घेतलं. यात महत्त्वाच्या भूमिकेत स्कोरर्सिसचा लाडका हिरो लिओनार्दो द कॅप्रिओ होता तर डॅनियल व्हीलनच्या. तरी बिल द बुचर साकारताना डॅनियलला न्यूमोनिआनं गाठलं होतं, तरी तो वॉर्मर कोट घालायला तयार नव्हता, ना औषध घ्यायला. का तर, म्हणे सिनेमात जो काळ दाखवला होता त्याच्याविरुद्ध होतं ते. त्या भूमिकेसाठी त्यानं चाकूफेकीचं तंत्रही अचूक शिकून घेतलं होतं. सिनेमा रिलीज झाल्यानंतर त्याला पुन्हा बाफ्टा मिळालं, पुन्हा एकदा ऑस्कर मानांकन.

यानंतरच्या काळात डॅनियलच्या आयुष्यात दिग्दर्शक रिबेका मिलर आली. प्रख्यात लेखक ऑर्थर मिलर यांची ही कन्या. दोघांनी विवाह केला. डॅनियलची प्रतिभा पाहून तिनं त्याला 'द बॅलड ऑफ जॅक अँड रोझ'मधील भूमिका देऊ केली होती. या सिनेमासाठी आवश्यक असलेल्या एकाकीपणाचा अनुभव घेण्यासाठी त्यानं काही काळ रिबेकापासूनही स्वतःला दूर ठेवलं.

'देअर विल बी ब्लड' हा 'ऑईल'

कादंबरीवरचा सिनेमा. डॅनियलसाठी दुसरं ऑस्कर मिळवून देणारा. पण पुरस्कार स्वीकारताना त्यानं ब्रोकबॅक माऊंटनमधल्या हीथ लीजरला आपली प्रेरणा मानतो, असं सांगून चकीत केलं होतं. या पुरस्कारानंतर दोन ऑस्कर मिळालेल्या मार्लन ब्रँडो आणि जॅक निकल्सन यांच्या रांगेत तो जाऊन बसला.

'नाइन' हा सिनेमा हा जगातल्या अप्रतिम सिनेमांपैकी एक. त्यासाठी त्याच्यावर पुरस्कारांची बरसात झाली. त्यानंतर म्हणजे २०१० मध्ये स्टिव्हन स्पिलबर्गच्या लिंकनमध्ये डॅनियलच असणार हे जाहीर झालं. हे जाहीर करावं लागलं याचं कारण म्हणजे फार वर्षांपूर्वी जेव्हा स्पिलबर्गनं त्याच्याकडे लिंकनचा प्रस्ताव ठेवला, तेव्हा त्यानं तो धुडकावला होता. पण २०१० मध्ये लिंकन करण्याबाबतचं त्याचं मत बदललं. अख्खं वर्ष डॅनियल लिंकनवरची पुस्तकं वाचत होता. आपण अब्राहम लिंकनसारखं दिसायला हवं, यासाठी तो मेक-अप आर्टिस्टशी तासन्‌तास चर्चा करत होता.

लिंकनसाठी डॅनियलनं घेतलेली मेहनत आपल्याला दिसते आणि आपण आवक् होतो. पुरस्कार घेताना डॅनियलचं भाषण हाही त्याच्यातल्या साधेपणाचं दर्शन घडवणारं असतं. सिनेमा ही मायानगरी आहे. पैसे कमावण्याचं साधन आहे. शंभर कोटी कमावले, पुरस्कार कमावले आणि चाहत्यांमध्ये लोकप्रिय झालो की आपण महाकलाकार झालो, असं वाटण्याचे सध्याचे दिवस आहेत. अशावेळी केवळ आपल्यातल्या कलाकारानं चाहत्यांना सर्वोच्च आनंद द्यावा आणि दोन तास पडद्यावर पाहिले तो चाहत्याच्या हृदयीचा कायमचा ठेवा ठरावा, हे जणू व्रत म्हणून स्वीकारलेला डॅनियल म्हणूनच वेगळा आणि असामान्य कलावंत ठरतो.

रिबेकाशी विवाह करण्यापूर्वी त्यानं फ्रेंच अभिनेत्री इझाबेला हिच्याशी लग्न केलं होतं. त्यांचा मुलगा गॅब्रियल आता सतरा वर्षांचा आहे. आर्थर मिलर यांच्या 'द क्रुसिबल'मध्ये काम करत असताना त्याचा मिलर यांची कन्या रिबेकाशी परिचय झाला. त्याचवर्षी म्हणजे १९९६ मध्ये त्यांचा विवाह झाला. त्यांना दोन मुलं आहेत. पण डॅनियल आपलं खासगी आयुष्य फारसं उघड्यावर आणत नाही. आयर्लंडच्या विकलो भागात राहणारा डॅनियल पार्टी, पीआर असल्या गोष्टीपासून कायम दूर राहतो.

**– अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१ ५०१
aparna.patil1@gmail.com

ग्रंथाली

## यशवंतराव चव्हाण : आठवणी-आख्यायिका – लक्ष्मण माने




**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

आठवणी यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या आणि कथन करणारे लक्ष्मण माने. उत्तम पुस्तक होण्यासाठी आणखी काय हवे आहे?
यात माने यांनी शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांना पत्ररूपाने या आठवणी सादर केल्या आहेत. खरे तर, हे कथन आहे सुप्रियाच्या पिढीसाठी. सुप्रिया निमित्तमात्र आहे.
यशवंतरावांचा जीवनपट विस्तीर्ण आहे व विविध पैलूंनी नटलेला आहे. त्यातील काही काळ व काही पैलू माने यांच्या वाट्याला आले आहेत. ते त्यांनी अत्यंत संवेदनशील मनाने टिपले आहेत व पत्ररूपाने सादर केले आहेत.
सध्याच्या पिढीसाठी आवश्यक व उपयुक्त असे चव्हाणसाहेबांच्यावरील लिखाण या निमित्ताने झाले आहे. यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने निर्माण झालेला हा महत्त्वाचा दस्तऐवज आहे.
ही पत्ररूप आठवणींची साठवण मराठी वाचकांच्या सदैव लक्षात राहील.

**– विनायक पाटील**

# अंधांसाठी सर्व काही !

**पद्मा कऱ्हाडे**

There are problems in the world
We will solve them
There are hindrances on the road
We will cross them
There are difficulties in life
We will overcome them
There are questions in life
We will answer them
Inspite of problems, hindrances,
difficulties
And questions
Life is Beautiful
We the students of *NIWANT*
Solemnly pledge that
We will try to make this world
More Beautiful place to live in

ही प्रार्थना आहे 'निवांत अंधमुक्त विकासालया'तील मुलांची. मुख्य म्हणजे त्यांनी प्रार्थनेतील प्रत्येक शब्दाचा अर्थ प्रयत्नपूर्वक आचरणात आणलेला आहे. त्यांनी त्यांचं आयुष्य खरोखरच सुंदर बनवलं आहे असं मी म्हणेन.

मी 'निवांत अंधमुक्त विकासालया'त गेले होते. अंदाजे चार तास तिथं होते. संस्थेच्या नावात 'निवांत' हा शब्द असला तरी तिथं एकही विद्यार्थी/विद्यार्थिनी एक क्षणभरही बसलेला दिसणार नाही. निवांतपणा हा त्यांच्या वृत्तीत आहे. ती सर्वजण अगदी रिलॅक्स मूडमधे असतात. मुक्तपणे, स्वत:च्याच घरात वावरत असल्याप्रमाणे ती असतात आणि ते त्यांचंच



मीरा बडवे

घर आहे असं जाणवलं मला. त्यांनी त्यांच्या अंधपणाचा बाऊ केलेला नाही, किंवा कोणी तसा करावा अशी अपेक्षाही त्यांनी ठेवलेली नाही. संस्थेची स्थापना मीरा बडवे यांनी १९९६ साली केली. त्यामागचा उद्देश हा की अंध मुलांना दहावीपुढील शिक्षण घेता यावं– मग ते कोणत्याही शाखेचं असो; आणि त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे शिक्षणाबरोबरच त्यांची शारीरिक, मानसिक व आत्मिक वाढ व्हावी.

संस्थेची स्थापना करावी असं केव्हा व का वाटलं, असं मी विचारलं, तेव्हा मीरा यांनी मला सांगितलं की त्यांचे पती आनंद हे त्यांच्या वाढदिवशी अंधांसाठी असणाऱ्या एका संस्थेत जाऊन देणगी देत असतात; रक्तदान करत असतात. एके वर्षी, मीरा यांना वाटलं, की चला, आपणही जाऊन बघुया, कुठे आपले पती जातात देणगी द्यायला व रक्तदान करायला ते! म्हणून त्याही आनंद यांच्याबरोबर गेल्या. तिथं छोटीशी अंध मुलगी मीरा यांना येऊन बिलगली, त्यांनी प्रेमानं, नकळतच तिला जवळ घेतलं. मीरा व ती मुलगी, दोघींनाही खूप चांगलं वाटलं. मीरा म्हणतात, तो क्षण माझ्या आयुष्याचा 'टर्निंग पॉईंट' झाला.

त्या दिवशी मीरा यांनी अंध मुलांसाठी काम करायचं ठरवलं. घरच्यांचा पाठिंबा होताच. आर्थिक परिस्थितीही चांगली होती. त्यांनी दहावीनंतरच्या पुढील शिक्षणासाठी अंध मुलामुलींना मदत करायची असं ठरवलं. मदत म्हणजे केवळ आर्थिक मदत नव्हे, तर त्यांना शिकवणं, त्यांच्या सर्व प्रकारच्या अडचणी सोडवणं.

मीरा MA (Literature) झाल्या आहेत. B.Ed. ही झाल्या आहेत. त्या पुण्यातच कर्नाटक हायस्कूलमधे नोकरी करत होत्या. त्यापूर्वी त्यांनी कॉलेजमधेही नोकरी केलेली आहे. मीरा यांना मुलगी झाली तेव्हा त्यांनी नोकरी सोडली व पुढे, काही वर्षांच्या गॅपनंतर, मुलगी मोठी झाल्यावर त्यांनी हे काम चालू केलं.

'निवांत अंधमुक्त विकासालया'ची स्थापना झाल्यापासून core teaching मीरा करतात. त्यांचे पती आनंद हे अकाउंट्स व इतर टेक्निकल गोष्टी पाहतात. तिथं येणारी मुलं कोणी आर्ट्स, कोणी, कॉमर्स, कोणी लायब्ररी सायन्स, कोणी लॉ शिकणारी आहेत. त्या प्रत्येकाला शिकवण्याचं, त्या मुलांच्या शंका सोडवण्याचं काम मीरा करतात. कोणी मराठी मिडियममध्ये शिकणारा, तर कोणी इंग्लिश मिडियममधे शिकणारा. प्रथम मीरा स्वत: तो विषय शिकतात. एका मुलीला लायब्ररियनचा कोर्स करायचा होता तर त्यासाठी मीरा यांनी आधी

तो कोर्स केला. विषय चांगला शिकवता येईल म्हणून! इकॉनॉमिक्स, सायकॉलॉजी, फिजिऑलॉजी, ॲनॉटॉमी, तुम्ही जे नाव घ्याल तो विषय मीरा मुलांना शिकवू शकतात. ॲनॉटॉमी शिकवण्यासाठी, मीरा स्वत: एका डॉक्टरकडे जाऊन सर्व शिकून आल्या व आता त्या मुलांना शिकवतात, म्हणजे मुलांची तयारी करून घेतात. त्या डिसेक्शनपर्यंत मुलांना शिकवू शकतात.

त्यांचं शिकवणं सकाळी सातपासून सुरू होतं. ते रात्री आठ-नऊपर्यंत अखंड चालू असतं. मुलं वेगवेगळी असतात, त्यांची संख्याही कमीजास्त असते. मुलं आपापली कॉलेजं करून मग निवांतमधे येतात. मीरा यांच्या बंगल्यात त्या मुलांचा मुक्त वावर असतो. त्यांच्याकडे दोनशे अंध मुलं विविध प्रकारचं शिक्षण घेत आहेत. मीरा स्वत: त्या सर्व मुलांची कॉलेजची फी भरतात.

पंधरा वर्षांनंतर, त्यांचे जे विद्यार्थी शिकून तयार झाले आहेत ते इतरांना शिकवायला निवांतमध्ये येतात. निवांतमधील विद्यार्थ्यांची नावं मेरिटमध्ये झळकलेली आहेत. बसवराज, शिवाजी लोंढे, विकास वाघमारे, वृषाली, नितीन धावरे यांनी आपापल्या ठिकाणी मोठं नाव मिळवलं आहे. काही मुलं जर्मन, फ्रेंच, जपानी भाषा शिकलेली आहेत. काही मुलांनी जपानी, फ्रेंच या भाषांवर प्रभुत्व मिळवलं आहे. ती मुलं त्या भाषांतील पुस्तकं ब्रेलमध्ये करत आहेत. मुलांसाठी 'ब्रेल प्रिंटर'ही घेतलेला आहे. तो लायब्ररियन वृषाली चालवते.

मीरा यांनी त्यांना शिकवताना आरंभी वेगवेगळे प्रयोग करून पाहिले. मुलं दहावी-बारावीपर्यंत मराठी मिडियममध्ये शिकलेली असतात. त्यांची नाळ इंग्रजी भाषेशी जुळलेली नसते. त्यांची इंग्रजी शब्दसंपदा कमी असते. मीरा यांनी त्यांच्यासाठी एक डिक्शनरी बनवली आहे. प्रथम शब्द व मग वाक्यं अशी त्यांची प्रगती होत जाते. मीरा त्यासाठी भरपूर वेळ देतात. हे सारं ब्रेल लिपीत केलं जातं. मीरा मुलांना शिकवताना महागडी टिचिंग एड्स वगैरे वापरत नाहीत. उलट, त्या आपल्या



रोजच्या वापरातल्या घरगुती वस्तूंचा वापर करतात. त्यातच त्यांचं कौशल्य आहे! उदाहरणार्थ, X axis, Y axis ही संकल्पना अंध मुलांच्या लक्षात आणून देण्यासाठी त्या हातांचा वापर करतात. कॉलम्स (Columns) आणि 'रो'ज (rows) ही संकल्पना शिकवण्यासाठी कागदाला घड्या घालून त्यांच्या साहाय्यानं शिकवतात. शरीररचना व डी.एन.ए. मॉडेल चिमटचात मणी अडकावून शिकवतात.

मीरा, मुलांना ब्रेलमध्ये नोटस देतात. त्या अंध मुलांसाठी काय शिकल्या नाहीत? त्या स्वत: इतक्या असंख्य गोष्टी, विषय शिकल्या आहेत आणि इतकं असून मीरा असं म्हणतात, की शेवटी, जर गणित केलं तर मला या मुलांमुळे जे शिकायला मिळालं त्याचं पारडं जास्त जड आहे.

काही मुलं JAWSच्या साहाय्यानं software विकसित करतात. त्या पाच जणांना पुण्यातील कंपन्यांमध्ये नोकरी मिळेना, म्हणून मीरा व आनंद यांनी त्यांच्यासाठी कंपनी काढली. अमेरिकेतील Boardwalk Tech. या कंपनीनं त्या मुलांना काम दिलं. भारतातील Dot.net नावाच्या कंपनीनंही त्यांना 'school sports program' संदर्भात काम दिलं आहे. पुण्यातील सारंग कुलकर्णी त्यांना मदत करतात.

मीरा यांनी 'कमावा व शिका' हा मंत्र मुलांना पहिल्यापासून दिला आहे. मीरा यांच्या बंगल्यातील एक खोली म्हणजे छोटीशी चॉकलेट फॅक्टरीच आहे! मुलं तिथं स्वत: चॉकलेट बनवतात, त्यांचं पॅकिंग करतात, ज्यांची ऑर्डर असेल तिकडे नेऊन पोचवतात. मुलं स्वत: चॉकलेट बनवण्यासाठी लागणारा माल, पॅकिंगसाठी लागणारं सामान आणण्यासाठी जातात, मोटारीनं, लाखांतील कॅश घेऊन मुंबईला क्रॉफर्ड मार्केटमध्ये जाऊन कच्चं चॉकलेट खरेदी करतात. त्यानंतर खारला जाऊन सॅटिन रिबन, इतर पॅकिंग मटेरियल विकत घेतात व पुण्याला परत येतात. चॉकलेटच्या ऑर्डर तर इतक्या आहेत, की काही वेळेस त्या पुऱ्या करणं म्हणजे तारेवरची कसरत असते मुलांची.

बहुतेक मुलं होस्टेलवर राहतात. फार थोडी घरी राहतात. मुलं कागदाची फुलं बनवणं, पेपरबॅग बनवणं, ग्रिटिंग कार्ड्स बनवणं ही कामं इथं करतात. प्रत्येक जण स्वत: पैसे कमावतो. दुसरीकडे शिक्षण चालू असतंच.

मीराताईंची मुलगी तर म्हणते, की मी सावत्र मुलगी आहे, हीच सर्व दोनशे मुलं आईची सख्खी मुलं आहेत!

मध्यंतरी, मीरा व आनंद अमेरिकेला पंधरा दिवस जाऊन आले. मीरा म्हणाल्या, की 'आमच्या इथं रामराज्य आहे. आम्हाला वॉचमन वगैरेची गरजच नाही.' बंगल्यात, बंगल्याच्या आवारात मुलं मस्त वावरत, गप्पा मारत असतात. आम्ही 'निवांत'मध्ये गेलो त्या दिवशी कोणीतरी केळी आणून दिली होती. त्यांचं वाटप सर्वांना एकजण करत होता. मुलं केळी खाऊन 'साली' व्यवस्थित 'डस्टबीन'मध्ये टाकत होती. शिस्त वाखाणण्यसारखी आहे.

मुलांनी सुधा मूर्तींची सर्व पुस्तकं, विंदा करंदीकर, नारायण सुर्वे, डॉ. अलका मांडके, पोपटराव पवार, डॉ. प्रेमानंद रामाणी, मीना प्रभू, संदीप खरे, सुधीर मोघे अशा अनेकांच्या पुस्तकांची ब्रेलमध्ये रूपांतरं केली आहेत. त्यांच्याकडे तीन हजार पुस्तकं आहेत. त्यांनी महाराष्ट्रात अजून चौदा ब्रेल लायब्ऱ्या चालू करून दिल्या आहेत.

शामक डावरनं येऊन मुलांना डान्स ट्रेनिंग दिलं आहे. मुलं योग करतात. त्यांची क्रिकेटची टीम आहे. मुलं 'स्टेज शो'ज करूनही फंड रेझिंग करतात. त्याचे आतापर्यंत पन्नास शो झाले आहेत. मुलं रक्तदान करतात, वृक्षारोपण करतात. जी मुलं शिक्षण पूर्ण करून कमावती झाली आहेत ती निवांतमधील नवीन मुलांना मदत करतात. त्याशिवाय आपल्या कमाईचा ठरावीक हिस्सा, ज्यांना आपल्यापेक्षा जास्त अपंगत्व आहेत अशांना दान करतात. उदाहरणार्थ, ऑटिझम, स्किझोफ्रेनिया इत्यादी. गेल्या पंधरा वर्षांत एक हजार मुलं निवांतमधून बाहेर पडली आहेत. ती सर्वजण नोकरी करत आहेत. महिना पाच-दहा हजार रुपये कमावत आहेत. काहींनी संसार थाटले आहेत. त्यांना मुलं आहेत. त्याविषयी मीरा यांनी गंमत सांगितली. त्या म्हणाल्या, की मला ब्रेल वाचता येत असल्यामुळे, त्यांची प्रेमपत्रंही मला वाचता येतात. त्यामुळे त्या संदर्भातही मला त्यांचं समुपदेशन करावं लागतं. सेक्स एज्युकेशनही द्यावं लागतं. मग मीच त्यांची लग्नं लावून देते.


मीरा यांनी आपला पूर्ण बंगला, आपलं पूर्ण आयुष्य, आपलं सर्वकाही अंध मुलांना दिलेलं आहे, देत आहेत. तेही नि:स्वार्थ भावानं!

**मीरा बडवे**
भ्रमणध्वनी ९४२२०३३१२२
http://www.niwantvision.com

**पद्मा कऱ्हाडे**
भ्रमणध्वनी : ९२२३२६२०२९
padmakarhade@rediffmail.com


## ग्रंथालीची नवीन प्रकाशने

**मनातले कवडसे**
**विश्वास काकडे**



**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**

**नगरमंथन**
**प्रकाश पेठे**




**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

## ‘वेगळा विदर्भ की अखंड महाराष्ट्र? एका वादाची सद्यस्थिती’ पुस्तकाचे पुण्यात प्रकाशन



पुस्तकाचे प्रकाशन करताना कुमार सप्तर्षी, मध्यभागी अध्यक्ष भाई वैद्य
डावीकडून – अन्वर राजन, डॉ. श्रीपाल सबनीस, उल्हास पवार, गिरीश बापट, नितीन केळकर आणि
लेखक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी




गोव्याचे राज्यपाल वांच्छू यांच्या हस्ते
आणि मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांच्या
प्रमुख उपस्थितीत
डॉ. पी.एस. रामाणी यांचा पंचाहत्तरीनिमित्त
गोव्यात जाहीर सत्कार
आणि
‘लाइफ ॲन्ड हेल्थ’ या
इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन

सोहळ्यात सहभागी विनायक नाईक,
आयोजक विष्णू सूर्या वाघ,
मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर,
राज्यपाल वांच्छू, डॉ. रामाणी,
प्रतिमा रामाणी
आणि
कुमार सरज्योतिषी



# पश्चिम महाराष्ट्राने विदर्भाचे शल्य समजून घेतले पाहिजे

**प्रतिनिधी**

राज्य छोटे की मोठे हा वादच कसा निरर्थक आहे आणि विकासाच्या मूळ प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्याचा तो कसा प्रयत्न आहे याकडे लक्ष वेधून, विदर्भासारख्या भागांची खरी गरज ही दबाव निर्माण करणारी विकास आघाडी उभारून, विकासाचे प्रश्न मार्गी लावणाऱ्या जनआंदोलनाची कशी आहे, हा महत्त्वाचा प्रश्न 'वेगळा विदर्भ की अखंड महाराष्ट्र? एका वादाची सद्यस्थिती?' या डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी ह्यांच्या या पहिल्याच, एकमेव आणि महत्त्वपूर्ण ग्रंथाने उपस्थित केला आहे. त्यासाठी विकासाचे प्रारूप कोणते असावे ह्या अतिशय महत्त्वाच्या मुद्याकडे ह्या ग्रंथाने प्रकर्षाने लक्ष वेधले आहे. लोकानुवर्ती विकासावर या लेखकाचा भर असून, नसत्या वादात लोकांना अडकवणाऱ्या राजकारणाचा ठामपणे विरोध करणारा हा लेखक व त्याचा हा ग्रंथ आहे, असे प्रख्यात समाजवादी नेते भाई वैद्य म्हणाले.

'ग्रंथाली' प्रकाशित 'वेगळा विदर्भ की अखंड महाराष्ट्र ? एका वादाची सद्यस्थिती' या डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी ह्यांच्या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ आयोजिण्यात आला होता. त्या समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून भाई वैद्य बोलत होते.

ग्रंथाचे प्रकाशन महाराष्ट्र गांधी स्मारक निधी व युवक क्रांती दलाचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी ह्यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी ग्रंथाचे लेखक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्यासह प्रमुख अतिथी म्हणून, आमदार उल्हास पवार तर आमदार गिरीश बापट, डॉ. श्रीपाल सबनीस व नितीन केळकर हे ग्रंथावर भाष्य करण्यासाठी उपस्थित होते.

या प्रसंगी बोलतांना भाई वैद्य पुढे म्हणाले की, ''हा ग्रंथ म्हणजे विदर्भाची सर्वांगीण चर्चा करणारा सकलविदर्भ-गाथेसारखा मूलभूत महत्त्वाचा ग्रंथ झाला असून या प्रश्नाशी संबंधीत सर्वच बाजूंची अभ्यासपूर्ण व विश्लेषक मांडणी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी या ग्रंथात परिश्रमपूर्वक केली आहे. चवचाल भांडवलशाहीने ठरवलेले अमेरिकन विकासाचे प्रारूप स्वीकारणाऱ्या राज्याचा आकार छोटा की मोठा हा वादच निरर्थक असल्याने, या ग्रंथाने विकासाचे कोणते प्रारूप स्वीकारायचे हा महत्त्वाचा प्रश्न समोर आणला हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य होय.''

ग्रंथाचे प्रकाशन करताना डॉ. कुमार सप्तर्षी ह्यांनी, 'सत्याला प्रदक्षिणा घालणारा महत्त्वाचा वैचारिक ग्रंथ' अशा शब्दात या ग्रंथाचे वर्णन केले. छोट्या राज्यात शांतता, समृद्धी नांदतेच असे नाही हे अनुभवांती सिद्ध झाले असल्याने व नक्षलवाद्यांनाही छोटी राज्ये हवी असल्याने मुळात वेगळ्या विदर्भाची मागणी ही जनविकासाची कशी ठरणार असा प्रश्न उपस्थित करून, वेगळा विदर्भ की अखंड महाराष्ट्र हे अकारणचे द्वंद्व असून विदर्भाशिवाय महाराष्ट्र नाही आणि महाराष्ट्राशिवाय विदर्भाला पर्याय नाही, विदर्भाच्या विकासासाठी पश्चिम महाराष्ट्रातील लोकांनी, नेतृत्वाने, विदर्भात आंदोलन करून विदर्भाचे प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न करायला हवेत. डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी ह्यांचा या ग्रंथातील विचार हा विकासानुवर्ती जनआंदोलनाचा असून जनआंदोलने ही गरिबांच्या, वंचितांच्या बाजूने झुकलेली असतात व म्हणून असे आंदोलन ही विदर्भाची जनविकासाची खरी गरज आहे असे लेखकाचे विवेचन असल्याचे डॉ. सप्तर्षी म्हणाले.

ग्रंथावर भाष्य करताना प्रख्यात समीक्षक डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले की, विदर्भाचा विकास ही संयुक्त महाराष्ट्राची जबाबदारी आहे हे ठामपणे मांडल्याबद्दल तसेच विदर्भाच्या राजकारण्यांचा व राजकीय पक्षांचा नव्हे तर वंचित, शोषित, अविकसितांचा पक्ष घेऊन समन्यायी विकास हेच राज्य छोटे की मोठे यापेक्षा महत्त्वाचे सत्य असून, जनतेची ही तिसरी बाजू ठामपणे मांडल्याबद्दल डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे अभिनंदनच करायला हवे. विदर्भाच्या प्राचीन व इतिहासकाळापासूनचे सर्वच क्षेत्रांतील वेगळेपण, मोठेपण, मोकळेपण व थोरवी तसेच वर्तमानातील सर्व प्रकारच्या वास्तवासह विदर्भाचे जनवास्तव समर्थपणे व सक्षमरीत्या मांडणारा हा एकमेव वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथ असून, विदर्भ वेगळा झाल्याने त्याचे शोषण थांबणार नसून त्यासाठी समन्यायी विकासाच्या प्रारूपाला व आंदोलनाला पर्याय नसल्याचे या लेखकाचे विचार सूत्र असल्याचे डॉ. सबनीस म्हणाले.

विदर्भाचे, विदर्भाच्या प्रश्नांचे वास्तव पश्चिम महाराष्ट्रासमोर एवढ्या ठामपणे व समग्रपणे मांडण्याचा हा पहिलाच प्रयत्न असणारा ग्रंथ महाराष्ट्राच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालणारा असून, विदर्भाचे शोषण थांबवून विकास साधायचा तर

विदर्भाचे स्वतंत्र राज्य आवश्यक असल्याचे व त्यासाठी समर्थ नेतृत्व आवश्यक असल्याचे सांगून भाजपा आमदार गिरीश बापट म्हणाले की, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांसारख्या लेखकांनीच या आंदोलनाला फुंकर घालण्याची गरज आहे. विदर्भाच्या विद्यमान अविकसित स्थितीला पश्चिम महाराष्ट्रा- इतकेच वैदर्भीय नेतृत्व व त्यांना जाब न विचारणारी वैदर्भीय जनता देखील जबाबदार असल्याचे आमदार बापट म्हणाले.


'सह्याद्री' वाहिनीचे माजी वृत्तसंपादक, क्षेत्रीय प्रसिद्धी विभागाचे संचालक नितीन केळकर म्हणाले की, आयुष्यभर अखंड महाराष्ट्राचे समर्थन केल्यावर आता वेगळ्या विदर्भाच्या बाजूने इच्छा असूनही कसे उभे राहायचे असा संभ्रम लेखकाच्या मनात असावा, असे हा ग्रंथ वाचताना वाटत राहिले. विदर्भावर होणाऱ्या अन्यायाबाबत तसेच जनआंदोलनांमधून स्वतंत्र विदर्भाचे राज्य निर्माण होण्याबाबत डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशींचे दुमत नसून, केवळ राजकारण्यांच्या सोयीसाठी राज्य वेगळे करण्याला त्यांचा विरोध असल्याचे या ग्रंथातून दिसते, असेही नितीन केळकर म्हणाले.

आमदार उल्हास पवार म्हणाले की, सबंध महाराष्ट्राला, प्राचीन काळापासून आजपर्यंतच्या विदर्भाचे तसेच विदर्भाच्या प्रश्नांचे सम्यक् आकलन करवून देणारा हा अतिशय अभ्यासपूर्ण रीतीने सिद्ध केलेला महत्त्वपूर्ण ग्रंथ असून, विदर्भाचे या ग्रंथातून प्रभावीपणे व्यक्त होणारे शल्य विदर्भेतर महाराष्ट्राने समजून घेणे आवश्यक आहे. डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी ह्यांनी या ग्रंथासाठी घेतलेले परिश्रम हे विदर्भाला वेगळे करण्या- साठी नसून, महाराष्ट्राने विदर्भासोबत असण्या- साठी काय करणे आवश्यक आहे त्यासाठी असल्याचेही आमदार उल्हास पवार म्हणाले.

ग्रंथाविषयीची लेखकाची भूमिका व्यक्त करताना डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी म्हणाले की, मुळात प्रश्न विदर्भाला काय वाटते यापेक्षाही, विदर्भेतर महाराष्ट्राला विदर्भ महाराष्ट्रात हवा आहे की नको असा प्रश्न विचारणे आवश्यक आहे. विदर्भ ही पश्चिम महाराष्ट्राला ऊर्जा पुरवणारी शक्ती असल्याने ती महाराष्ट्राचे 'असेट' वाटत असेल तर विदर्भाच्या समन्यायी विकासाचा आग्रह पश्चिम महाराष्ट्राने धरला पाहिजे आणि त्यासाठी अखंड महाराष्ट्र समिती फक्त विदर्भात नव्हे तर विदर्भाबाहेर पश्चिम महाराष्ट्रानेही स्थापली पाहिजे. आज राज्य आणि जनता यांत जी प्रचंड दरी पडली आहे व त्यामुळे राज्य हेच जिथे जनतेचे उरलेले नाही तिथे ते छोटे की मोठे याला अर्थच उरत नाही, हे वाद केवळ राज्यकर्त्यांच्या हिताचे वाद ठरतात, जनतेच्या नव्हे. लेखकाची भूमिका ही केवळ राजकारणी व त्यांच्या पक्षांच्या सत्ता यासाठी राज्याचे तुकडे पाडण्याच्या विरोधात असून, जनतेच्या समर्थ आंदोलनातून वेगळे राज्य झाल्यास तसे होण्यापासून कोणीच थांबवू शकणार नाही अशी असल्याचे डॉ. जोशी म्हणाले. राज्य स्वतंत्र करण्याचे निकषही निश्चित केले जावेत मात्र समन्यायी विकासाचे आंदोलन उभे झाल्यास राज्याचे तुकडे पाडण्याची वेळच येणार नाही हे लक्षात घेऊन; तसे व्हावे ही लेखकाची भूमिका असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक युवक क्रांती दलाचे उपाध्यक्ष अन्वर राजन यांनी केले. त्यात त्यांनी ग्रंथाचे प्रयोजन तसेच गांधी निधी व युक्रांदने पुढाकार घेऊन पुण्यात प्रकाशन करण्यामागे विदर्भ काय आहे व विदर्भातील समस्यांचे वास्तव काय आहे ते पश्चिम महाराष्ट्राला नीटपणे कळावे ही भूमिका असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन युक्रांदचे राज्य सचीव संदीप बर्वे यांनी केले.


## वेगळा विदर्भ की अखंड महाराष्ट्र? एका वादाची सद्यस्थिती

**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**

विदर्भ वेगळा का हवा अथवा का नको या दोन्ही बाजूंची तसे, या दोन्ही बाजूंव्यतिरिक्त तिसऱ्या बाजूचीही विस्ताराने व विवेचक अशी दखल घेणारा असा हा पहिलाच आणि एकमेव ग्रंथ...

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# क्षितिज जसे दिसते...

## सुषमा रा. बर्वे

सकाळ, दिव्य मराठी, प्रहार अशासारख्या दैनिकांमधून कौशल इनामदार ललित लेखन करत होता. बालगंधर्व सिनेमाचा संगीतकार झाल्यावर नियमित लेखन करणे त्याला शक्य झाले नाही. परंतु पूर्वप्रकाशित लेखांचे संकलन करून त्याने 'क्षितिज जसे दिसते...' हे पुस्तक मैत्रेय प्रकाशनामार्फत प्रकाशित केले. त्याचा आनंद वाचकांना नक्कीच होणार आहे.

पूर्वप्रकाशित लेखांमधून इतके देखणे पुस्तक उमलले आहे की त्यामुळे रसिक वाचकाला हा एक मोठा लाभ आहे! आजचा दर्जेदार संगीतकार त्याच्या कलाकृतींच्या कहाण्या आम्हाला सांगत आहे आणि आम्ही त्या कथा आवडीने ऐकत आहोत असे वाटते. कलाव्यवहारातून घडणाऱ्या अनेक गोष्टी, ह्या स्नेहाच्या देवाणघेवाणीच्या साखळ्या, भिन्न अनुभव, त्या अनुषंगाने घडणारे प्रसंग, विचारांच्या दिशा, कधी भावनांचा गुंता असे जीवनाचे कित्येक पैलू स्फटिकवत ह्यातून दिसतात. प्रेक्षकांच्या किंवा श्रोत्यांच्या आयुष्यात असे किस्से घडत नाहीत. कलावंताचे निष्काम कर्म, व्यवहारातील गुंता हा सामान्य लोकांच्या अनुभवात येत नाही. नऊ-दहा महिने जबाबदारीचे ओझे डोक्यावर सांभाळून कलाकृती बनवायच्या आणि प्रेक्षकांच्या प्रतिक्रियांची वाट पाहायची. सारेच अनिश्चित!

परंतु ह्या लेखमालेतील प्रत्येक लेख एक वेगळे रूप घेऊन जन्माला आला आहे. भाषा अप्रतिम आहे. लेखनाला लालित्य असून शेवट वाचकांवर सोपवलेला व वाचकाला लक्षात न येणारा आहे ही ह्या लेखांची गोडी आहे. संगीतकार कवीच्या शब्दांशी संवाद साधतो एवढेच नव्हे तर देव आणि भक्त यांच्यातील अखंडित द्वैतात जे आकर्षण कायम असते तेच कवीच्या शब्दांशी सुरांचे नाते असते; अतूट! संगीतकार त्या शब्दांचे नुसते अर्थ सांगत




नाही तर त्यातून झरणारा विचारदेखील तो रसिकांपर्यंत पोचवतो. ते शब्द, तो अर्थ, तो मेळ आपले सूर घेऊनच येतो जणू! कवितेला चाल देता देता मला कविता उलगडत जाते असा अनुभव कलावंत सांगत असतो. ग्रेसच्या कवितांना चाली देताना तसा अनुभव संगीतकाराने स्वत: घेतलेला आहे. अजय-अतुलच्या 'मन उधाण वाऱ्याचे...' ह्या गीताची चाल खरोखर मनाला ऊन आणि पाऊसही बनवते कारण दोन अंतऱ्यातला वेगळेपणा! असे कौशलला वाटते.

कृष्णधवल, एका मैफलीची कथा, शंकरराव बिनीवाले, एक साहित्यिक वारी असे काही जास्त उल्लेखनीय लेख या पुस्तकात आहेत. त्यातून कितीतरी नवीन गोष्टी आपल्याला कळतात. अख्तर-उल-इमान हा केवळ पटकथाकार नाही तर एक उत्कृष्ट कवी होता किंवा गजलच्या साऱ्या शक्यता गालिबने हाताळल्या आहेत हे सत्य तो सांगतो. (मिर्झा गालिब हा संपूर्ण सिनेमा पाहूनही प्रेक्षकांच्या लक्षात येत नाही.) कौशल बंगाली किंवा कन्नड गीतांमधील निराळेपण अचूक शोधतो. एवढेच नव्हे तर मराठी माणसातला अभ्यासक, समीक्षक नकळत जागाच असतो असे त्याला वाटते. साहजिकच त्याची दृष्टी तुलनात्मक असते. रचनेतील सूक्ष्मता, त्यातले वेगळेपण त्याच्या मनाला जाणवते. 'निरोपाच्या वेळी' या लेखात इंग्रजीखेरीज इतर भाषांमध्ये पुन्हा भेटण्याचे आश्वासन असते. भेटीची आशा व्यक्त केली जाते. 'चलते चलते मेरे ये गीत याद रखना' किंवा 'अखेरचा हा तुला दंडवत' अशी सद्भावना त्यात दिसते. आपण नुसते 'गुडबाय' म्हणून भेट संपवत नाही.

*'अंधार फार झाला । पणती जपून ठेवा'*

ह्या हिमांशु कुलकर्णी यांच्या ओळी त्याला महत्त्वाच्या वाटतात. त्याचवेळी अशोक नायगावकरला झालेला बोधही त्याला होतो.

*'अंधार करा, उजेड फारच झाला!*
*मज रात्र हवी, नक्षत्रांचा गजरा'*

मुंबईच्या रात्री चांदण्याविरहित असतात. चंद्र-चांदण्या हे माणसाला लाभलेले देणे आहे हे आपण विसरतो. कुसुमाग्रजांसारख्या कवीला नवलाख तळपणाऱ्या विजेच्या दिव्यांना सोडून माजघरातल्या मंद दिव्याच्या ज्योतीकडे वळावे असे वाटते त्यालाही हेच कारण असावे.

सर्वात महत्त्वाचा लेख आहे 'एकविसाव्या शतकातील मराठी संगीतकार!' ह्यात अर्थाची विशालता आणि संगीतकाराची सम्यक् दृष्टी यांचे महत्त्व सांगितले आहे. संगीतकाराने सद्यस्थितीतील आव्हाने स्वीकारून, संगीत दर्जेदार कसे ठेवावे ह्याचा मार्गदर्शक तपशील त्याने सांगितला आहे, स्वत:साठी व इतर संगीतकारांसाठीही. कौशल इतर संगीतकारांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवतो आणि म्हणतो, 'A lot can happen over coffee!' कॉफी पिता पिता बरेच काही घडू शकते. 'ही निकामी आढ्यता का? दाद द्या अन् शुद्ध व्हा!' असे शुद्ध मन ठेवून, ३५० समूहगायकांसह 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' हे सुरेश भटांचे, मराठीवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सहभागी करून घेणारे 'मराठीचे अभिमान गीत' त्याने केले आणि यशाचे माप त्याला सहजच मिळून गेले!

ह्या पुस्तकातील एकेक लेख म्हणजे मनाला हवेहवेसे वाटणारे वरदान आहे. कसे ते पाहा. तो म्हणतो, सुधीर फडके यांच्या 'ष'च्या उच्चाराच्या आकर्षणाने बाबूजींची गाणी अधिक आवडीने ऐकू लागलो. त्यांचे संगीत मराठी चित्रपटसृष्टीची श्रीमंती आहे असे कौशल मानतो. दूरदर्शनवरील चिमणराव-गुंड्याभाऊंचे दिवस आठवल्यावर ह्याला अरुण म्हात्रेची कविता आठवली.

*'ते दिवस आता कुठे जेव्हा फुले बोलायची*
*दूर ती गेली तरीही सावली भेटायची!'*


कौशलचे मन फुलांच्या नाजुकतेने उमलणारे आहे. त्याच्या आठवणी खूप वेळा कृष्णधवल चित्रपटांशी संलग्न होतात. 'मुंबईचा जावई', 'गंगेत घोडं न्हालं', 'अवघाचि संसार', 'संथ वाहते कृष्णामाई' हे चित्रपट त्याच्याशी अजूनही संवाद साधतात. ह्याचे कारण तो सांगतो, की राजा गोसावी, अरुण सरनाईक आदी नट अभिनय न करता थेट प्रेक्षकांशी बोलतात. एवढेच नव्हे, तर कौशलने मनाचा एक कोपरा ओनरशिप बेसीसवर 'का रे दुरावा, का रे अबोला' या गाण्यासाठी दिला. त्याला वाटते, चांदण्याचा म्हणून काही आवाज असेल तर तो आशा भोसलेंचा आवाज असेल. 'केव्हातरी पहाटे...उरले उरात काही आवाज चांदण्याचे' हे आशाबाईंचे गाणे रसिकांनाही एक दैवी योग वाटतो. आशाबाईंच्या आवाजात 'हात चांदण्याचा घेऊनी उशाला' हे शब्द ऐकून आपल्या अंगावर कुणी चांदणे शिंपडल्याचा भास ऐकणाऱ्या प्रत्येकाला होतो. परंतु श्रोत्यांना ते अशा शब्दांत व्यक्त करता येत नाही. इथे संगीतकार गायकावर प्रेम करतो, वादकांवर प्रेम करतो; म्हणून असा संगीतकार यशस्वी होतो. पैलतीरावरील गूढ आणि रम्य प्रदेशावरही नव्याचा शोध घेणे ही त्याच्या आत्म्याची गरज होते. सगळ्यात कमाल केली आहे त्याने 'बालगंधर्व' साकारताना!

बालगंधर्व चित्रपटासाठी रवी जाधव, महेश लिमये, अभिराम भडकमकर अशा गुणी कलाकार-तंत्रज्ञांचा ग्रुप तयार होत गेला. त्या मांदियाळीत कौशल इनामदारचा समावेश झाला हे तो भाग्य समजतो. नितीन चंद्रकात देसाई यांनी बोलावून या चित्रपटाचे संगीत त्याने करावे हे सुचवले होते. गुणीजनांच्या सान्निध्यात कौशलने बालगंधर्वांची ओळख करून घेतली. बालगंधर्वांची नक्कल वाटता कामा नये, नाहीतर बालगंधर्वही खोटे वाटतील! म्हणून दोन महिने एकही गाणे ध्वनिमुद्रित केले नाही. पण... शैला दातार या गायिकेने आनंदगंधर्व (आनंद भाटे) यांना ऐकण्याचा सल्ला दिला. त्यातूनच त्याला बालगंधर्वांचा आवाज मिळाला. त्यामुळे साऱ्या गुंत्यातून सुटल्याचा आनंद ह्या संगीतकाराला झाला. ही यशस्वी भरारी कौशल घेऊ शकला! ही भरारी कशी घेतली हे प्रत्यक्ष पुस्तक वाचल्यावर कळेल... क्षितिज जसे दिसते...

**– प्रा. सुषमा रा. बर्वे**
'बर्वे हाउस', १७७ सांडू रोड,
चेंबूर-४०००७१
दूरध्वनी (०२२) २५२८८२९२
भ्रमणध्वनी : ९९३०३६३७१५


# तृष्णाकाठ

**वैभव देशमुख**




कवितेमुळे तर लहरतोय थोडासा हिरवा रंग
नाहीतर अशा उन्हाळ्यात कोण असतं कोणाचं
मी झाडांनाही सावल्या चोरतांना पाहिलंय...

**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**

# मौन होई बोलके

**प्रा. शाम जोगळेकर**

आपण सर्वसामान्य आपल्या दैनंदिन आणि कौटुंबिक जीवनात मग्न असतो. भोवतालच्या लोकांच्या व्यक्तिगत आणि सामाजिक प्रश्नांकडे आपले कळत-नकळत दुर्लक्षच होत असते. समाजसेवा, सामाजिक ऋण आदी कल्पना अमलात आणण्याकडे आपला फारसा कलही नसतो. त्यामुळे त्या दृष्टीने प्रयत्नही केले जात नाहीत. परंतु एखाद्या प्रसंगातून स्फूर्ती मिळून समाजसेवेचे मोठे कामही एखाद्या व्यक्तीकडून होऊ शकते. अपंगांसाठी काहीतरी करण्याचा विचार उत्स्फूर्तपणे मनात डोकावल्यानंतर त्यादृष्टीने कार्य केल्याने, मध्यमवर्गीय कुटुंबांतील सर्वसामान्य गृहिणीने पुढील काळात केलेल्या नेत्रदीपक कामगिरीचे वर्णन आणि विविध अनुभव रोहिणी लिमये यांच्या 'मौन होई बोलके' या पुस्तकात वाचावयास मिळतात. 'ग्रंथाली'ने ते प्रसिद्ध केले आहे.

सुरुवातीला रोहिणी लिमये यांनी आपल्या पतीकडून लेखनासाठी कशी प्रेरणा मिळाली हे स्पष्ट केले आहे. आईवडिलांकडून त्यांना बालपणीच समाजसेवा करण्यासाठी प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळाले होते. परंतु नेमकी दिशा एका छोट्याशा प्रसंगातून मिळाली. एक दिवस त्यांनी अंध व्यक्तीस रस्ता ओलांडण्यासाठी त्याचा हात धरून मदत केली. त्याचवेळी रस्त्यावर दोन मुले परस्परांना खाणाखुणा करत, एकमेकांशी बोलत चालली होती. भरधाव वेगाने जाणाऱ्या गाडीने दिलेला हॉर्न त्यांना ऐकू आला नाही. शिवी हासडून गाडीवाला निघून गेला. ती दोन मुले बहिरी होती. अंधांचे व्यंग जाणवते. त्यांना मदतीचा हात मिळतो. परंतु कर्णबधिरांचे व्यंग कोणाला दिसत नाही, जाणवत नाही. त्यांच्या वाट्याला त्यामुळेच उपेक्षा आणि अवहेलना





येते हे ध्यानी येऊन, पतीच्या संमतीने रोहिणीबाईंनी कर्णबधिरांसाठी काम करायचे ठरवले. त्यासाठी त्यांनी शिक्षकांसाठीचे प्रशिक्षण घेतले. सुरुवातीला रोहिणीबाईंनी कर्णबधीर असलेल्या छोट्या ज्योतीला घरीच शिकवले. हळुहळू ज्योती बोलू लागली. चार-पाच वर्षांच्या तिच्या सहवासाने त्यांना परस्परांचा लळा लागला. ज्योतीच्या अपघाती निधनाचा रोहिणी लिमयेंना प्रचंड मानसिक धक्का बसला. या प्रसंगी ज्योतीच्या दु:खी आई-वडिलांनी त्यांना धीर दिला. परिणामी, विकास विद्यालय सुरू झाले. अकाली मरण पावलेल्या छोट्या ज्योतीमुळे रोहिणीबाईंना कर्णबधिरांसाठी शाळा काढण्याची स्फूर्ती मिळाली होती.

रोहिणीबाईंचे बालपण खालापूर येथे व्यतीत झाले. चौथीपर्यंतचे शिक्षण संपल्यावर त्यांच्या डॉक्टर वडिलांनी आणि सुविद्य आईने त्यांना पुण्याला पुढील शिक्षणासाठी पाठवले. बालपणीच्या काळाविषयी आणि आईवडिलांच्या समाजसेवेसंबंधीच्या संस्कारांविषयी त्यांनी सविस्तर लिहिले आहे. विवाहानंतर त्या मुंबईत दादरला एकत्र कुटुंबात राहावयास आल्या. कर्णबधिरांना शिकवण्यासाठी सुरुवातीला त्यांच्या घरीच शाळा सुरू झाली. पुढे स्वतंत्र जागेत विकास विद्यालय सुरू झाले. शाळेतील दैनंदिन कार्यक्रम, आलेल्या अडचणी, विशिष्ट शिक्षणपद्धती याविषयी त्यांनी सविस्तरपणे सांगितले आहे. १९७२ मध्ये रोहिणीबाईंना अमेरिकेत जाण्यासाठी शिष्यवृत्ती मिळाली. तेथील विविध अनुभव त्यांनी प्रभावीपणे नोंदवले आहेत. विशेष शिक्षक म्हणून १९८९ साली त्यांना राष्ट्रीय पारितोषिक मिळाले. त्यांच्या शिक्षणसंस्थेला १९९२मध्ये राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला. राष्ट्रपतींच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारण्याचा बहुमान रोहिणीबाईंना प्राप्त झाला. मात्र ऑगस्ट १९९६ मध्ये त्यांनी स्थापन केलेल्या शिक्षण संस्थेतून त्यांना बाहेर पडावे लागले. त्यानंतर त्यांनी हिंदुजा हॉस्पिटलमध्ये डॉ. मिलिंद कीर्तनेंबरोबर काम केले. कॉकलिअर इम्प्लांट युनिटमध्ये समुपदेशकाचे काम त्यांनी शिकून घेतले. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा लाभ अनेक कर्णबधिरांना आणि त्यांच्या पालकांना झाला. यासंबंधीचे त्यांचे अनुभव अतिशय हृद्य आणि वाचनीय आहेत. कर्णबधिरांची परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांनी विविध उपायही आपल्या अनुभवांच्या आधारे सुचवले आहेत. रोहिणी लिमये यांची ऐंशी वर्षांची वाटचाल वाचकाला थक्क करून सोडते आणि प्रेरणाही देते.

**- प्रा. शाम जोगळेकर**
गव्हर्नमेंट कॉलनीच्या मागे, अलिबाग
भ्रमणध्वनी : ९२७३३४३१७७

डॉ. नरेंद्र जाधव यांनी अनुवादित व संपादित केलेल्या 'बोल महामानवाचे' आणि 'रवींद्रनाथ टागोर जीवनदर्शन' या संग्राह्य ग्रंथत्रिवेणी




'बोल महामानवाचे'
जनआवृत्ती संच
मूळ किंमत १२०० रु.
सवलतीत ८०० रुपयांत
अधिक टपाल खर्च १०० रु.

'रवींद्रनाथ टागोर जीवनदर्शन'
डिलक्स आवृत्ती संच
मूळ किंमत १२०० रु.
सवलतीत ८०० रुपयांत
अधिक टपाल खर्च १०० रु.




इंग्रजी थिसॉरसच्या धर्तीवर मराठीत प्रथमच
सुरेश वाघे लिखित 'संकल्पनाकोश'चे पाच खंड




संचाची मूळ किंमत ३९७५ रु. सवलतीत २५०० रुपयांत

ग्रंथाली

द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई-४०००१६ ● दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५० ● granthali02@gmail.com

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने

महाड





उंडाळे











नंदुरबार




धुळे






'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली' करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा बुलन मिल म्युनि. स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.